# बिलीवर्स ईस्टर्न चर्च

## लेक्शनरी

रविवारची आराधना आणि इतर विशेष दिवसाचे पवित्र
शास्त्र वाचन २०२४-२०२५

*Imprimatur*

Metropolitan, Believers Eastern Church

Copyright © 2024

*Prepared by*

Synodal Department of Liturgics and Catechization

All rights reserved. No portion of this book may be reproduced
in any form without prior written permission from the publisher.

Believers Eastern Church
World Headquarters, St Thomas Community, Kuttapuzha P.O.
Thiruvalla - 689 103, Kerala

Price: 50.00

*Printed in India.*

# सामग्री सारणी


| | |
|---|---|
| १. प्रस्तावना | ४ |
| २. पवित्र शास्त्र वाचन | ५ |
| ३. चर्च कॅलेंडर | ६५ |
| ४. विशेष दिवस | ७२ |

## प्रस्तावना

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा, एका खऱ्या परमेश्वराच्या नावात, आमेन.

बिलिवर्स ईस्टर्न चर्चचे मूलभूत तत्त्व म्हणजे परमेश्वराच्या वचनाचे वाचन, अभ्यास आणि शिकवण्याला आम्ही प्राधान्य देतो. हे केवळ प्रेषित आणि चर्चच्या याजकानी आपल्याला दिलेला नमुना आहे म्हणून नाही तर परमेश्वराचेवचन शक्तिशाली आहे आणि आपले जीवन बदलण्याचे माध्यम आहे.

परमेश्वराच्या वचनात आतून आणि बाहरिल जीवन बदलण्याची शक्ती आहे. " परमेश्वराचे वचन सजिव, सतेज, कोणत्याहि दुधारी तरवारीपेक्षा तीक्ष्ण, जीव व आत्मा सांधे व मज्जा यांस भेदून आरपार जाणारें आणि मनाच्या भावना व कल्पना यांचे परीक्षक असे आहे. " (इब्री ४:१२).

पवित्र शास्त्र आपल्याला जगण्यासाठी दैवी तत्त्वे प्रदान करते आणि ते आपल्याला आशा आणि विश्वास देते. "याप्रमाणे विश्वास वार्तेने वा वार्ता ख्रिस्ताच्या वचनाने होते " (रोमकरास पत्र १०:१७). हे महत्वाचे आहे की आपण वचन वाचावे आणि त्याचा अभ्यास करवा आणि आपल्या पॅरिशमध्ये ते नियमितपणे शिकवावे .

हा उद्देश साध्य करण्यासाठी ही लेक्शनरी पवित्र शास्त्र भागांचे एक संकलन आहे जे ह्या वर्षाच्या रविवारच्या उपासनेसाठी आणि विशेष दिवसांसाठी आयोजित केलेली आहे. अशाप्रकारे हे आपल्यासाठी पामेश्वराच्या वचनांना पद्धतशीरपणे वाचण्यासाठी आणि त्याचा अभ्यास करण्यासाठी मार्गदर्शक ठरते.

माझी प्रार्थना आहे की ही लेक्शनरी सर्वांच्या ज्ञानात आणि परमेश्वरा बरोबर चालण्यास आमच्या सर्व पैरीशांना निरोगी, मजबूत आणि चैतन्यशील बनवीण्यास मदत करेल.
पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याचा आशीर्वाद तुम्हाबरोबर असो. आमेन.✠

✠ मोरान मोर सॅम्युअल थियोलफिलस मेट्रोपोलिटन

चर्चचे जागतिक मुख्यालय २९ ऑक्टोबर २०२४

| **३ नोव्हेंबर २०२४**<br>**पहिला रविवार**<br>**चर्चचे पवित्रीकरण (कूडघोष इथो)** | | | |
|---|---|---|---|
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| यशया ६:१-८ | स्तोत्रसंहिता ४३ | १ करिंथकरास पत्र ३:१६,१७ आणि ६:१५-२० | संत मत्तय १६:१३-२३ |

**शुभवर्तमान विषय : येशू ख्रिस्त, देवाचा पुत्र आहे**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

तो कोण आहे याबद्दल इतरांचे काय म्हणणे आहे हे विचारल्यानंतर, येशूने त्याच्या शिष्यांना तोच प्रश्न विचारला. संत पेत्राने दैवी प्रकटीकरणाद्वारे योग्यरित्या उत्तर दिले आणि येशू म्हणला की चर्च स्वतः विश्वासाच्या या खऱ्या कबुलीजबाबावर बांधले गेले आहे. तरीही नंतर, जेव्हा येशूने त्याच्या आगामी दुःखांबद्दल बोलला, तेव्हा संत पेत्रस ते समजू शकला नाही आणि सैतानाचे विचार बोलू लागला.

**यातून आपण काय शिकतो?**

जरी लोकांची समज भिन्न असली कि येशू कोण आहे, तरी आम्ही विश्वासाने कबूल करतो की येशू हाच ख्रिस्त, जिवंत देवाचा पुत्र आहे!

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. ही कबुली चर्चचा पाया आहे.

२. चर्चचा एक भाग असल्यामुळे, आम्ही आमच्या कौटुंबिक प्रार्थना आणि चर्चमध्ये एकत्रितपणे आणि वैयक्तिकरित्या नायसिन पंथाचे पठण करून दररोज आमच्या विश्वासाची कबुली देतो.

३. कोणीही नाही, अगदी मृत्यू (अधोलोक) देखील चर्चला येशू आणि तो जगाला देऊ करत असलेल्या तारणाची घोषणा करण्यापासून थांबवू शकत नाही.

| **१० नोव्हेंबर २०२४** | | | |
|---|---|---|---|
| **दुसरा रविवार** | | | |
| **चर्चचे समर्पण (हुडोश इथो)** | | | |
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| १ राजे ८:२२-४० | स्तोत्र संहिता ७८:१-७ | इब्री ९:१–१४ | संत योहन १०:२२-३८ |

**शुभवर्तमान विषय :** देवाचा आवाज ऐका आणि त्याचे अनुसरण करा.

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

येशू म्हणतो की तो मेंढपाळ आहे जो त्याचे ऐकतो आणि त्याचे अनुसरण करतो त्यांना अनंतकाळचे जीवन देतो, जरी असे बरेच लोक आहेत जे त्याच्यावर विश्वास ठेवणार नाहीत किंवा त्याचे ऐकणार नाहीत, जरी त्यांनी येशूने केलेली अनेक चमत्कार पाहिले आहेत.

**यातून आपण काय शिकतो?**

येशू हा चांगला मेंढपाळ आहे आणि आपण त्याच्या आवाजाचे अनुसरण केल्यास आपण सुरक्षित राहू. आपण हे देखील शिकतो की परुशी येशूला दगडमार करायला तयार होतात कारण तो देवाचा पुत्र असल्याचा दावा करतो.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. जेव्हा आपण परमेश्वराचे वचन ऐकतो आणि वाचतो तेव्हा आपण परमेश्वराचा आवाज ऐकत असतो.

२. ऐकणे म्हणजे आज्ञा पाळणे; आणि आज्ञापालन म्हणजे परमेश्वराने जे पवित्र वाचनातून सांगितले आहे त्यावर विश्वास ठेवणे आहे.

३. जेव्हा आपण मेंढपाळाच्या आवाजाचे अनुसरण करतो तेव्हा आपण याची खात्री बाळगू शकतो आम्ही चुकणार नाही.

| १७ नोव्हेंबर २०२४ | | | पालकांचा रविवार - विशेष अर्पण |
|---|---|---|---|
| ३ रा रविवार | | | |
| घोषणेचा हंगाम: बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे जन्माचे भाकीत केले आहे | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| उत्पत्ति १७:१५-२२ | स्तोत्रसंहिता १२३ | २ पेत्र १: १-१५ | संत लूक १: ५-२५ |

**शुभवर्तमान विषय** : परमेश्वराच्या अभिवचनांवर विश्वास ठेवा

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

परमेश्वर चमत्कारिकपणे एका मुलासाठी एका वृद्ध नीतिमान जोडप्याच्या प्रार्थनेला उत्तर देतो. परमेश्वराचा देवदूत सांगतो कि मुलाचे नाव काय ठेवावे, त्याचे संगोपन कसे करावे आणि सर्वांचे तारण करण्यात त्याची भूमिका काय असेल. परंतु वडील जकारियामध्ये विश्वासाची कमतरता असते आणि परिणामी तो आपल्या मुलाच्या जन्मापर्यंत बोलू शकत नाही.

**यातून आपण काय शिकतो?**

परमेश्वर त्याच्या स्वतःच्या चमत्कारिक मार्गांनी आपल्या प्रार्थनांचे उत्तर देतो. परंतु आपण आपल्या जीवनासाठी परमेश्वराच्या अभिवचनांवर विश्वास ठेवला पाहिजे आणि कार्य केले पाहिजे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. जरी परिस्थिती व्यावहारिकदृष्ट्या अशक्य वाटत असली तरीही परमेश्वर चमत्कार करू शकतो.

२. परंतु आपल्याला विश्वास असणे आवश्यक आहे कारण विश्वासाशिवाय देवाला संतुष्ट करणे अशक्य आहे [इब्री. ११:६]

३. विश्वास आपल्याला परमेश्वराच्या अभिवचनांवर कार्य करण्याकडे घेउन जायला पाहिजे.

| २१ नोव्हेंबर २०२४ थियोटोकोसच्या प्रवेशाचा उत्सव | | | |
|---|---|---|---|
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| निर्गम ४०:१-५,९-१० | १राजे ८:१, ३-४ ६-७,९-११ | इब्री लोकांस ९:१-७ | संत लूक १०:३८ -४२, ११:२७-२८ |

**शुभवर्तमान विषय : आम्ही जिवंत परमेश्वराची मंदिरे आहोत**

**हा उस्तव कशाबद्दल आहे?**

हा उत्सव जसा पवित्र चर्चच्या जिवंत परंपरेनुसार दिला गेला आहे, संत मरियेच्या पालकांद्वारा येरुशलेम मंदिरात सादर केल्याचे स्मरण करवते, जेव्हा ती छोटी मुलगी होती .

**यातून आपण काय शिकतो?**

आपण शिकतो की, त्यांच्या नवसाची पूर्तता करण्यासाठी, माता मरियाच्या पालकांनी तिला येरुशलेममधील मंदिरात नेले, जेथे याजक जखरिया (बाप्तिम्या करणाऱ्या संत योहानाचे वडील) यांनी तिचे स्वागत केले आणि संत योसेफाशी लग्न होईपर्यंत ती परमेश्वराची सेवा करत राहिली.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. जसे माता मरीयेच्या आई – वडिलांनी तिला परमेश्वराच्या सेवेसाठी समर्पित केले त्याचप्रमाणे आपणही पालक या नात्याने असेच करण्याची इच्छा बाळगली पाहिजे.

२. माता मरीयेच्या जीवनाबद्दल विचार करण्याची ही चांगली वेळ आहे - विशेषत: परमेश्वराची आज्ञा पाळण्याची तिची संपूर्ण तयारी.

३. ही उस्तव नाताळाच्या (ख्रिसमसच्या) फक्त एक महिना आधी साजरा केला जात असल्याने, येशु ख्रिस्ताच्या जन्माच्या सणाची (नाताळाची) प्रतीक्षा करण्यास आपल्याला मदत होते.

| | | | |
|---|---|---|---|
| **२४ नोव्हेंबर २०२४** | **४ था रविवार** | | |
| **घोषणेचा हंगाम: येशूच्या जन्माची घोषणा मरियेला केली जाते** | | | |
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| उत्पत्ती २८:१०-२२ | स्तोत्रसंहिता ४०:५-१० | इब्री २: १४-१८ | संत लूक १: २६-३८ |

**शुभवर्तमान विषय** : आज्ञाधारकपणे प्रतिसाद द्या

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

गॅब्रिएल दुताला मानवजातीसाठी सर्वात मोठी बातमी सांगण्यासाठी मरिया नावाच्या तरुण कुमारिकेडे गालिलमध्ये पाठवले जाते. तिची प्रतिक्रिया परमेश्वराच्या प्रती आज्ञाधारकता आहे.

**यातून आपण काय शिकतो?**

मरिया आमचा विश्वास, आज्ञाधारकपणा आणि संताच्या जीवनासाठी सर्वात मोठे उदाहरण आहे, कारण जरी तिला सर्व अशक्य परिस्थितीची जानिव असतानाही तिने देवदूताने सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवण्याचे निवडले आणि स्वतःला परमेश्वराच्या इच्छेसाठी समर्पित केले.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आम्ही माता मरीयेचा आदर करतो, आणि तिला धन्य म्हणतो!

२. देवावर विश्वास ठेवा आणि आपण म्हणूया - 'तुझ्या इच्छेनुसार ते माझ्याशी होऊ दे.'

३. जसे माता मरीयेचे जीवन ख्रिस्ताकडे निर्देश करते, तसेच आपले जीवन देखील ख्रिस्ताकडे निर्देशित करूया.

| १ डिसेंबर २०२४ महिला रविवार–विशेष दान–भेट<br>५ वा रविवार<br>घोषणेचा हंगाम: संत मरियाची एलिझाबेथला भेट | | | |
|---|---|---|---|
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| नीतिसूत्रे ३१: १०-३१ | स्तोत्रसंहिता ८०:१-७, १७-१९ | १ पेत्र ३:१-७ | संत लूक १: ३९-५६ |

**शुभवर्तमान विषय** : आशीर्वादित आशिर्वाद देण्यासाठी

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

हा शास्त्रभाग एलिझाबेथ आणि माता मरियाच्या भेटीबद्दल आहे. येथे मरिया एक भविष्यसूचक गाणे गाते, तिच्या गर्भधारणेचा चमत्कार देवाला सांगते. ती स्वत:ला नम्र करते आणि अशा महान गोष्टी करणाऱ्या देवाला उंच करते.

**यातून आपण काय शिकतो?**

कारण मरियाने परमेश्वराच्या वचनावर विश्वास ठेवला आणि ते स्वीकारले, माता मरिया आता सर्व पिढ्यांसाठी आशीर्वाद बणली आहे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. परमेश्वर जेव्हा त्याची वचने पूर्ण करतो तेव्हा त्याला आशीर्वाद देण्यास विसरू नका.

२. जेव्हा आपण मरीयेला धन्य म्हणतो तेव्हा आपण या परिच्छेदातील भविष्यवाणी पूर्ण करतो.

३. येशू ख्रिस्ताद्वारे तारणाची सर्वात मोठ्या देणगीसाठी परमेश्वराला सर्व गौरव देण्यासाठी आणि इतरांना सांगण्याचा हि एक विशेष संधी आहे.

| ८ डिसेंबर २०२४ | | मुलांचा रविवार–विशेष दान- भेट | |
|---|---|---|---|
| ६ वा रविवार | | | |
| घोषणेचा हंगाम: बाप्तीस्मा करणाऱ्या योहानाचा जन्म (अग्रदूत) | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| १ शमुवेल १: २०-२८ | स्तोत्रसंहिता १२७:१-५ | इफिस ६:१-४ | संत लुक १: ५७ - ८० |

**शुभवर्तमान विषय** : आपले जीवन लोकांना ख्रिस्ताकडे निर्देशित करू द्या.

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

जकारिया आणि एलिझाबेथ यांना परमेश्वराने दिलेली वचने पूर्ण झाली, जकारियाचे तोंड उघडले आणि त्यांनी त्यांच्या मुलाचे नाव योहान ठेवले - याचा अर्थ 'परमेश्वराची कृपा'. आणि त्याच्या श्रेष्ठ पाचारणामुळे, योहान अग्रदूत लोकांपासून दूर वाढला, एक अतिशय खास सेवेसाठी तयार झाला.

**यातून आपण काय शिकतो?**

आपण शिकतो की परमेश्वर त्याची अभिवचने पूर्ण करतो आणि परमेश्वर त्याच्या खास उद्देशांसाठी निवडलेल्यांना बोलावतो आणि तयार करतो. आणि तो उद्देश योहानासाठी 'अग्रदुत' वबनण्यासाठी होता, जो येशूच्या पुढे गेला आणि मार्ग तयार केला.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. मुले ही परमेश्वराने दिलेली देणगी असल्याने, परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे पालकांनी त्यांचे संगोपन केले पाहिजे.

२. पालक या नात्याने, आपण प्रार्थना केली पाहिजे की आपली मुले आपले जीवन अनेकांना तारणामध्ये आणण्यासाठी समर्पित करतील.

३. आपली भूमिका देखील संत योहाना सारखी असली पाहिजे - आपल्या शब्दांनी आणि कृतींद्वारे ख्रिस्तामध्ये तारणाचा मार्ग दाखविणे.

| **१५ डिसेंबर २०२४** | | | |
|---|---|---|---|
| **७ वा रविवार** | | | |
| **संत योसेफला घोषणा** | | | |
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| यशया ४५:१८-२५ | स्तोत्रसंहिता १२६ | १ पेत्र २:११-१७ | संत मत्तय १:१८-२५ |

**शुभवर्तमान विषय** : जेव्हा आपण आज्ञा पाळतो तेव्हा परमेश्वराच्या योजना पूर्ण होतात

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

लग्नाआधी मरीया गरोदर असल्याचे योसेफला कळल्यानंतर, प्रभूचा एक देवदूत त्याला मरियेला पत्नी म्हणून घेऊन जा आणि तिला सोडून देऊ नको असे सांगतो. मग तो पूर्णपणे अशक्य प्रकट करतो - की मरियाचे मूल हे सामान्य मूल नव्हते, परंतु पवित्र आत्म्याने गर्भधारणा केली होती.

**यातून आपण काय शिकतो?**

येशूच्या जन्माच्या जवळजवळ ६०० वर्षांपूर्वी, प्रेषित यशयाने कुमारीद्वारे तारणकर्त्याच्या जन्माबद्दल भाकीत केले होते. आता योग्य वेळी, वचन पूर्ण झाले. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की परमेश्वर त्याची वचने पूर्ण करेल.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. ज्याप्रमाणे संत जोसेफने परमेश्वराची आज्ञा पाळली, त्याचप्रमाणे आपणही परमेश्वराने सांगितलेल्या गोष्टींचे पालन केले पाहिजे, जरी आपण त्याचे मार्ग समजू शकत नसलो तरीही.

२. प्रोत्साहन करा; परमेश्वर त्याची अभिवचने पूर्ण करेल, जरी आपल्याला वाटत असेल की त्याला उशीर झाला आहे.

३. धीर धरायला शिका; विश्वास ठेवा.

| २२ डिसेंबर २०२४ | नाताळाच्या पूर्वीचा रविवार |
|---|---|
| ८ वा रविवार | |

**पवित्र शास्त्र वाचन**

| यशया ११:१-९ | स्तोत्र ८९:१-४, १९-२६ | प्रेषितांची कृत्ये ३:१६-२६ | संत योहान १:१-१४ |
|---|---|---|---|

**शुभवर्तमान विषय** : परमेश्वर मानव रुप धारण करतो

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

संपूर्ण पवित्र शास्त्रातील हा सर्वात महत्त्वाचा परिच्छेद आहे. हे आपल्याला सांगतो की, शब्द - म्हणजे येशू, देवाचा चिरंतन पुत्र, त्याने आपल्यासारखा संपूर्ण मानवी स्वभाव (देह) धारण केला आणि मनुष्यांमध्ये राहतो [इमॅन्युएल - परमेश्वर आपल्यासोबत].

**यातून आपण काय शिकतो?**

आपण शिकतो की येशू पूर्णपणे (१००%) परमेश्वर होता आणि त्याच वेळी पूर्णपणे (१००%) मानव होता. आम्ही शिकतो की जगाचा प्रकाश येशूला आपल्या जीवनात 'प्राप्त' करण्याचा, परमेश्वराच्या जीवनात भाग घेण्याचा आणि अशा प्रकारे 'परमेश्वराची मुले' होण्याचा एक अतुलनीय विशेषाधिकार मिळाला आहे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. येशूच्या मानवीय दृष्टीकोनाला जाणण्यासाठी शुभवर्तमानाला वाचा - तो कसा जगला आणि कसे काम करत असे.

२. आज आपण इतरांसमोर येशूचे प्रतिनिधित्व करतो; आम्ही त्याच्यासारखे जगूया.

३. असे अनेक आहेत जे अजूनही आध्यात्मिक अंधारात आहेत. सतत प्रार्थना करा कि परमेश्वराचा प्रकाश त्यांच्या अंतःकरणात चमकेल.

| २५ डिसेंबर २०२४ | | | |
|---|---|---|---|
| येशू ख्रिस्ताच्या जन्माचा सण - नाताळ (येल्डो) | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| यशया ९:१-७ | स्तोत्रसंहिता ९६ | इब्री १:१-१२ | संत मत्तय २:१-१२ |

**शुभवर्तमान विषय :** परमेश्वर त्याचे तारणाचे वचन पूर्ण करतो

**ही सण कशाबद्दल आहे?**

आम्ही सण साजरे करतो कि कसा परमेश्वर येशू खिस्तद्वारे मनुष्याच्या रुपात जन्म घेऊन मानवतेमध्ये प्रवेश केला.

**यातून आपण काय शिकतो?**

आपण मानवजातीसाठी परमेश्वराचे तारण देण्याच्या वचनाच्या पूर्ततेबद्दल शिकतो, जे बाळ येशूच्या रूपाने पूर्ण झाले. येशू ख्रिस्ताच्या जन्माचा वृतान्त दैवी हस्तक्षेपांनी भरलेला आहे - बेथलेहेममध्ये भविष्यवाण्या पूर्ण करणाऱ्या गोठ्यात जन्मलेले मूल, एक तारा ज्याने पूर्वेकडील ज्ञानी पुरुषांना विशेष भेटवस्तू सोबत आणले, त्यांना दुसऱ्या मार्गाने परत नेले गेले, ज्या देवदूतांनी जन्म घोषित केला. शेतातील मेंढपाळांना आणि बालक येशूला दुष्ट राजाच्या क्रोधापासून दैवी संरक्षण दिले गेले.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. नाताळच्या हंगामात, 'एकमेकांना ख्रिस्त जन्मला आहे' असे बोलून शुभेच्छा द्या आणि त्याचा प्रतिसाद देण्यासाठी 'त्याचे गौरव करा' असे म्हणा.

२. परमेश्वराने आपल्यासाठी आणि सर्व मानवजातीसाठी जे काही केले आहे, त्याबद्दल आनंदाने नाताळ साजरा करा.

३. या संधीचा उपयोग करत इतरांना कल्पकतेने शब्दातआणि कृतीद्वारे नाताळची कथा सांगा .

| | |
|---|---|
| **२९ डिसेंबर २०२४** | **नाताळ नंतरचा पहिला रविवार** |

**९ वा रविवार**

**पवित्र शास्त्र वाचन**

| | | | |
|---|---|---|---|
| उत्पत्ति ३७:१२-२८ | स्तोत्रसंहिता १४८ | १ करिंथ. १०:१-१३ | संत मत्तय २:९-१५ & १९-२३ |

**शुभवर्तमान विषय** : जसा परमेश्वर मार्गदर्शन करतो, तसे त्याचे अनुसरण करा

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

हा उतारा याबद्दल आहे कि कसे परमेश्वराने येशूला बालपणात नष्ट करण्याची दुष्टाच्या योजनेला अयशस्वी केले आणि कसे या सर्व गोष्टींद्वारे, येशूने मशीहा विषयीच्या प्राचीन भविष्यवाण्या पूर्ण केल्या.

**यातून आपण काय शिकतो?**

शत्रूने कितीही प्रयत्न केले तरी, परमेश्वराची योजना आणि हेतू नष्ट होऊ शकत नाही. परमेश्वर केवळ त्याची अभिवचने पूर्ण करणार नाही, तर त्यांचे संरक्षण देखील करेल ज्यांच्याद्वारे त्याची अभिवचने पूर्ण केली जातील.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. ज्ञानी पुरुष आणि येशूचे जागिक पिता संत योसेफ सारखे, परमेश्वराच्या मार्ग्दर्शानाचे अनुसरण करा.

२. पालक, विशेषकरुन पिता, कारण मुले लाहान आसताना त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्याची आसते, त्यांनी परमेश्वराचे काळजी पूर्वक ऐकले पाहिजे.

३. परमेश्वराच्या संरक्षणावर विश्वास ठेवा: आपल्यासाठी, आपल्या कुटुंबासाठी आणि आपल्या मुलांसाठी.

| ५ जानेवारी २०२५ | १० वा रविवार | | नाताळ नंतरचा दुसरा रविवार |
|---|---|---|---|
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| यशया २६:१-१२ | स्तोत्र ८५ | इब्रीकरास पत्र ११:२३-३१ | संत लूक २:४०-५२ |

**शुभवर्तमान विषय : परमेश्वर आणि मनुष्याच्या अनुग्रहात वाढने**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

त्यांच्या प्रथेप्रमाणे वल्हांडणाचा सण साजरा केल्यावर, येशूचे कुटुंब परत आले केवळ एका दिवसानंतर समजले की बालक येशू त्यांच्यासोबत नाही. आई-वडीलांना तो परमेश्वराच्या मंदिरात सापडतो, ज्यांनी त्याला ऐकले त्या प्रत्येकाला त्याच्या बुद्धीने आश्चर्यचकित केले. बालक येशू नंतर त्याच्या पालकांसह परत येतो आणि परमेश्वर आणि माणसांच्या अनुग्रहात मोठा होतो.

**यातून आपण काय शिकतो?**

येशूला त्याच्या जीवनातील उद्देश स्पष्टपणे माहीत होता; तरीही त्याचे शहाणपण आश्चर्यकारक असतानाही, तो आज्ञेमध्ये वाढला, त्यामुळे तो परमेश्वर आणि मनुष्याच्या अनुग्रहात वाढला.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आपण त्या लोकांच्या अधीन असले पाहिजे ज्यांना आपल्या जीवनावर अधिकारी म्हणून नेमिले गेले आहे. उदा: मुले पालकांच्या अधीन राहिले पाहिजे.

२. तुमच्या अधिकारांच्या अधीन राहल्याने स्वत: देवासोबत आणि लोकांसोबतही परमेश्वराची कृपा प्राप्त होते.

३. येशूप्रमाणे, आपण कोठेही असलो तरी, आपण पित्याच्या कार्यात सहभागी असले पाहिजे - जे सर्वांसाठी तारणाची बातमी घेऊन येत आहे.

| ६ जानेवारी २०२५, सोमवार<br>आमच्या प्रभूच्या थेओफनीचा सण(डेन्हो) | | | |
|---|---|---|---|
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| यशया १२:१-६ | स्तोत्र २९ | इब्री १०:१५-२५ | **संत** मत्तय ३:१-१७ |

**शुभवर्तमान विषय** : येशूमधील सर्व सृष्टीचे नविनीकरण

**हा सण कशाबद्दल आहे?**

हा उत्सव संत योहानाद्वारे यर्देन नदीत येशु ख्रिस्ताचा बाप्तिस्माचा उत्सव साजरा करणे आहे.

**यातून आपण काय शिकतो?**

आपण शिकतो, येशू कोण आहे आणि उत्तर परमेश्वराने स्वतः सार्वजनिकपणे जाहीर केले आहे की येशू त्याचा पुत्र होता. आपण हे देखील शिकतो की येशू देवाचा कोकरा बनण्यासाठी आला होता जो जगाचे पाप स्वतःवर घेईल. तसेच, येशूच्या बाप्तिस्म्याच्या वेळी सृष्टीचे नविनीकरण होते.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. **पाण्यावर आशीर्वाद:** उस्तावाच्या वेळी, याजक पात्र (काचेच्या भांड्यात) किंवा अगदी मोठ्या पाण्याच्या स्थळि (समुद्र, नद्या किंवा तलाव) पाण्याला आशीर्वादित करतो (प्रार्थना करतो). या आशीर्वादित पाण्याचा वापर घरांच्या आशीर्वादासाठी केला जातो.

२. **आपल्या घरांवर आशीर्वाद:** पवित्र (किंवा आशीर्वादित) पाणी वापरून याजक घरोघरी जातात आणि ते आणि आपल्यासह आतल्या सर्व वस्तुना आशीर्वादित करतात. अशा प्रकारे आपण आपली घरे आणि चर्च यांच्यात आध्यात्मिक संबंध प्रस्थापित करतो.

३. बाप्तिस्म्यामध्ये आणि त्याद्वारे आपण परमेश्वराच्या कुटुंबाचे सदस्य बनतो, पाण्याने शुद्ध केले जातो आणि मुरोनद्वारा (तेल) मोहर केले जातो, जे पवित्र आत्म्याचे प्रतिक आहे.

| १२ जानेवारी २०२५ | | | थिओफनी नंतरचा पहिला रविवार |
|---|---|---|---|
| ११ वा रविवार | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| यशया ४९:७-१३ | स्तोत्र ९१ | इफिसकरास पत्र १:३-१४ | संत. मत्तय ४:१-२२ |

**शुभवर्तमान विषय** : मोहांवर मात करणे

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

या शास्त्र भागत, येशू पवित्र शास्त्राच्या सामर्थ्याने सैतानाच्या मोहांवर मात करतो. नंतर येशू त्यांची पृथ्वीवरील सेवा सुरू करतो , लोकांना पश्चात्ताप करण्यासाठी आमंत्रित करतो आणि त्याच्या पहिल्या शिष्यांना 'त्याचे अनुसरण करण्यास' सांगतो.

**यातून आपण काय शिकतो?**

येशूप्रमाणेच आपलीही परीक्षा होईल आणि आपल्या विश्वासाची परीक्षा होईल. परंतु येशूप्रमाणे आपणही पवित्र शास्त्राच्या सामर्थ्याने विजय मिळवू शकतो.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. पवित्र शास्त्र ऐकण्याची, वाचण्याची, अभ्यास करण्याची, मनन करण्याची आणि लक्षात ठेवण्याची सवय लावा

२. जेव्हा प्रलोभने येतात तेव्हा परमेश्वराचे वचन आठवा आणि कबूल करा. दुष्टाने आणलेल्या मोहांवर मात करण्यासाठी ते एक शक्तिशाली माध्यम आहे.

३. जसे हे येशूच्या बाबतीत होते, पवित्र शास्त्र आपल्याला समजून घेण्यास आणि अशा प्रकारे सैतानाच्या फसवणुकीला तोंड देण्यास मदत करेल.

| १९ जानेवारी २०२५ | | | थिओफनी नंतर दुसरा रविवार |
|---|---|---|---|
| | १२ वा रविवार | | |
| | पवित्र शास्त्र वाचन | | |
| यशया ५१:१-८ | स्तोत्र १३९:१–६,१३–१८ | इब्री लोकांस १:१-२; २:१–४ | संत. योहान १:४३-५१ |

**शुभवर्तमान विषय :आपल्याला पाचारणापूर्वीच तो आपल्याला ओळखतो**

**हा शास्त्र भाग कशाबद्‌दल आहे?**

फिलिप्प आपला मित्र नथनेला (जो बार्थोलोम्यू म्हणूनही ओळखला जातो) येशूकडे कसा आणतो याचे वर्णन ह्या शास्त्र भागत केले आहे.

**यातून आपण काय शिकतो?**

आपल्याला पाचारण्यापूर्वीच परमेश्वर आपल्याला ओळखतो - ज्याप्रमाणे येशूने नथनेलचे शुद्‌ध हृदय ओळखले होते आणि फिलिप्पाव्दारे येशूकडे आणण्यापूर्वी तो कोठे होता हे त्याने पाहिले होते.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. परमेश्वर लोकांचा वापर करू शकतो मग ते कोठून आले आहेत याची पर्वा न करता. नाझरेथमधून काहीही चांगले येऊ शकते यावर कोणाचाही विश्वास नव्हता.

२. फिलिप्पने नथनेलला दिलेले आमंत्रण 'ये आणि बघ' हे ख्रिस्ताचा वैयक्तिगत अनुभव घेण्याचे आमंत्रण आम्हा सर्वांसाठी आहे.

३. जसे फिलिप्पने आपल्या मित्राला येशूकडे आणले, त्याचप्रमाणे लोकांना येशूकडे आणण्यासाठी संधी शोधा.

| २६ जानेवारी २०२५ | | | थिओफनी नंतर तिसरा रविवार<br>याजकाचा रविवार - विशेष अर्पण |
|---|---|---|---|
| | १३ वा रविवार | | |
| | पवित्र शास्त्र वाचन | | |
| यिर्मया ३१:१-१२ | स्तोत्र ६२:५-१२ | १ करिंथकरास पत्र ३:१६–४:५ | संत योहन ३:१-१२ |

**शुभवर्तमान विषय :** नवीन जन्म

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

येशू निकोदेमाला परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करण्याचा मार्ग प्रकट करतो - पुन्हा जन्म घेऊन. येशू पुढे म्हणतो: पुन्हा जन्म घेणे म्हणजे पाण्याने (बाप्तिस्मा) आणि आत्म्याने (पवित्र आत्म्याचे वरदान) जन्म घेणे होय.

**यातून आपण काय शिकतो?**

नवीन जन्म हे एक आध्यात्मिक रहस्य आहे. ही आपल्या तारणाच्या प्रवासाची सुरुवात आहे, ज्यामध्ये आपण बाप्तिस्म्याच्या पाण्यात येशूसोबत सामील होतो [रोम ६:१-१०] आणि अभिषेक करून पवित्र आत्मा प्राप्त करतो.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. बाप्तिस्मा हा परमेश्वराच्या राज्यात प्रवेश असल्याने, आपल्या तारणाच्या प्रवासाची सुरुवात, आपण सर्वांनी वयाची पर्वा न करता बाप्तिस्मा घेतला पाहिजे.

२. पश्चात्ताप आणि विश्वास या दोन्ही गोष्टी पाण्यातील आपल्या बाप्तिस्म्यासोबत असणे आवश्यक आहे

३. आपण जे आधीच परमेश्वराच्या राज्याचा भाग आहोत, आपल्यावर अनेकांना परमेश्वराची मुले होण्यासाठी आमंत्रित करण्याची आणि नवीन जन्माचा अनुभव घेण्याची जबाबदारी आहे.

**२ फेब्रुवारी २०२५** **थिओफनी नंतरचा चौथा रविवार**

**१४ वा रविवार**

**ख्रिस्ताला दाखवण्याचा सण ( मायाल्थो)**

**पवित्र शास्त्र वाचन**

| | | | |
|---|---|---|---|
| यशया ११:१-१० | इब्री लोकांस ७:७-१७ | इफिसकरास पत्र ३:१३-२१ | संत लूक २:२२-४० |

**शुभवर्तमान विषय** : जे त्याची वाट पाहत आहेत त्यांच्यासाठी परमेश्वर स्वतःला प्रकट करतो

**ही सण कशाबद्दल आहे?**

हा सण येशूला मंदिरात याजक समोर त्याच्या पालकांनी यहुदी कायद्यांच्या आवश्यकतांनुसार त्याच्या जन्माच्या ४० दिवसां नंतर सादर करण्याच्या स्मरणार्थ आहे.

**या सणातून आपण काय शिकतो?**

आम्हांला आठवण करून दिली जाते की जे लोक पवित्र आहेत आणि संत शिमोन आणि संत अण्णा प्रमाणेच त्याला भेटण्याची आतुरतेने वाट पाहत आहेत अशा लोकांसमोर आपला प्रभु स्वतःला प्रकट करेल. येशू पूर्णपणे मानव आहे आणि हे त्याने कायद्याच्या सर्व आवश्यकता पूर्ण करून दाखवले.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. प्रसूती नंतर धन्यवादाची विधी: बाळाच्या जन्माच्या ४० दिवसांनंतर, सुरुवातीच्या चर्चने स्त्रियांना मुलाच्या आणि आईच्या सुरक्षिततेबद्दल आभार मानण्याकारीता चर्चमध्ये येण्यास सांगितले.

२. नवजात (बाळ) देखील एकाच वेळी चर्चमध्ये बाप्तिस्मा आणि क्रिस्मेशनसाठी तयार केले जातात. अशा प्रकारे पालक जाहीरपणे घोषित करतात की त्यांची मुले परमेश्वराने दिली आहेत आणि परमेश्वराच्या गौरवासाठी त्यांचे पालनपोषण केले जाईल.

३. मेणबत्त्या पकडणे - ख्रिस्त हा परराष्ट्रीय लोकांसाठी प्रकटीकरणाचा प्रकाश आहे या संत शिमोनच्या संदर्भाचे प्रतीक म्हणून, या सणाच्या दैवी लीटर्जी दरम्यान विश्वासू लोक मेणबत्त्या पेटवतात.

| ९ फेब्रुवारी २०२५ थिओफनी नंतरचा पाचवा रविवार<br>१५ वा रविवार | | | |
|---|---|---|---|
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| यशया ४:८-२० | स्तोत्र १११ | २ करिंथकरास पत्र ४:१-६ | संत मार्क १:१२-२० |

**शुभवर्तमान विषय :** येशूच्या पाचारणाला प्रतिसाद

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

ह्या शास्त्रभागत येशूच्या पृथ्वीवरील सेवेची सुरुवात दर्शवितो, जिथे तो लोकांना पश्चात्ताप करण्यास बोलावतो आणि परमेश्वराच्या राज्याची सुवार्तेची घोषना करतो आणि त्याच्या पहिल्या शिष्यांना त्याचे अनुसरण करण्यास बोलावतो.

**यातून आपण काय शिकतो?**

परमेश्वराने आपले पहिले शिष्य होण्यासाठी साध्या, सामान्य आणि अशिक्षित लोकांना निवडले. परंतु त्यांनी ख्रिस्ताला प्रतिसाद दिल्याने आणि त्याचे अनुकरण केल्यामुळे ते प्रेषित बनले [इफि. २:२०] ज्यांच्यावर चर्च बांधले गेले आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने ते 'जग बदलणारे' बनले [प्रेषितांची कृत्ये १७:६].

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. पश्चात्ताप ही केवळ येशूसोबतच्या आपल्या प्रवासाची सुरुवातच नाही तर आपल्या जीवनातील एक सतत चालानारी वास्तविकता आहे.

२. आपण येशूच्या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी, सर्व काही मागे टाकून त्याचे अनुसरण करण्याची तयारी केली पाहिजे.

३. परमेश्वर त्याच्यासाठी पराक्रमी गोष्टी साध्य करण्यासाठी सहसा साध्या लोकांचा वापर करतो.

| | | | |
|---|---|---|---|
| **१६ फेब्रुवारी २०२५** | | | |
| **१६ वा रविवार** | | | |
| **सर्व स्वर्गीय राहवासी याजक** | | | |
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| अनुवाद ३४:१-८ | स्तोत्र ९० | १ थेस्सलनीकरास पत्र ४:१३–५:११ | संत मत्तय २४:४२-५१ |

**शुभवर्तमान विषय** : स्वामीचे परतणे ( मालकचे परतणे )

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

आपल्या नोकराला त्याच्या घराची जबाबदारी देऊन स्वामी निघून जातो. मग स्वामी अनपेक्षित वेळी परत येतो आणि त्याच्या सेवकांना त्यांच्या विश्वासूपणानुसार किंवा कारभारीपणानुसार बक्षीस देतो.

**यातून आपण काय शिकतो?**

ही दृष्टांत आपल्यासाठी एक चेतावणी आहे - आपण आपला स्वामी, येशू ख्रिस्ताच्या पुनरागमनासाठी सदैव तयार असले पाहिजे. त्याच्या येण्यास उशीर झाल्याने आपण बेजबाबदार किंवा वाईट बनू नये. उलट, आपण विश्वासू आणि शहाणे असले पाहिजे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. येशू आज परत येईल या मनाने प्रत्येक दिवस जगा.

२. सेवकाला विश्वासू आणि त्याच्यावर सोपवण्यात आलेल्या गोष्टींसाठी जबाबदार असण्यास म्हटले जाते.

३. जेव्हा आळशी होण्याचा मोह होतो तेव्हा, आपल्याला जे काही दिले आहे त्याबद्दल आपण विश्वासू आणि मेहनती असल्यास आपल्या प्रतीक्षेत असलेल्या पुरस्कारांबद्दल स्वतःला आठवण करून द्या.

| | | | |
|---|---|---|---|
| २३ फेब्रुवारी २०२५ | | | माहान लेंट सुरू होण्यापूर्वीचा रविवार |
| १७ वा रविवार<br>सर्व स्वर्गीय रहवासी विश्वासू | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| यशया ३८:१०-२० | स्तोत्र १११ | १ करिंथकरास पत्र १५:२०-२८ | संत लूक १२:३२-४८ |

**शुभवर्तमान विषय**: आम्हाला जे काही दिले गेले आहे त्याच्याशी विश्वासू रहा

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

येशू एका मालकाबद्दल एक दृष्टांत सांगतो जो लग्नासाठी गेला होता जो आपल्या नोकराला त्याच्या घराची काळजी घेण्यासाठी सोडून गेला होता आणि कसे एका सेवकाला कोणत्याही वेळी अगदी रात्री उशिरापर्यंत आपल्या मालकाच्या आगमन नंतर त्याचे स्वागत करण्यास कसे तयार असले पाहिजे.

**यातून आपण काय शिकतो?**

आपण स्वतःला विचारू या: जेव्हा आपला स्वामी एका अनपेक्षित वेळी परत येतो, तेव्हा त्याने आपल्याला जे काही दिले आहे त्यावर आपण विश्वासू असल्याचे आढळेल का? किंवा तो आपल्याला आळशी आणि विसराळू असे पाहिलं? आपण अवश्य आपली कंबर बांधली पाहिजे आणि आपले दिवे नेहमी जळत असले पाहिजेत [संत लूक १२:३५].

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. अनेकांप्रमाणे येशूच्या परत येण्याचा नेमका 'दिवस' शोधण्याच्या परीक्षेत पडू नका. हे फक्त पिताच जाणतो. [संत. मार्क १३:३२]

२. आपल्या स्वामींने आपल्यापैकी प्रत्येकावर पालक, पती/पत्नी, मूल, कामगार, याजक इत्यादी जबाबदाऱ्या दिल्या आहेत. त्या निष्ठेने पार पाडूया.

३. जे आपल्या गुरुला ओळखतात, आपण अधिक सावध असले पाहिजे. जर आपल्याला माहित असेल की आपल्या मालकाला काय हवे आहे आणि तरीही आपण त्याच्या इच्छेप्रमाणे केले नाही तर आपली शिक्षा खूप मोठी असेल.

| माहान लेंटची सुरुवात | | | |
|---|---|---|---|
| २ मार्च २०२५ | | माहान लेंटचा पहिला रविवार | |
| १८ वा रविवार | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| यशया ५८:५-१४ | स्तोत्र ५०:१-६ | कलस्सैकरास पत्र ३:१ -१७ | संत योहान २:१-११ |

**शुभवर्तमान विषय : येशू दुःखाचे आनंदात रूपांतर करतो**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

एक विवाह जेथे त्याचे शिष्य आणि आई देखील उपस्थित होती, येशू पाण्याला द्राक्षरसा मध्ये बदलतो, ज्यामुळे अनेकांनी त्याच्यावर विश्वास ठेवला.

**यातून आपण काय शिकतो?**

जरी आपल्या जीवनात अनपेक्षित गोष्टी घडतात तेव्हाही येशू एक चमत्कार करू शकतो आणि आपली परिस्थिती आनंदात बदलू शकतो. सहसा, चांगला द्राक्षारस बनवायला अनेक वर्षे लागतात, परंतु येशूला पाणी द्राक्षारसात बदलण्यासाठी फक्त एक क्षण लागला.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. अनपेक्षित त्रास आणि दुःखाच्या क्षणी, चमत्कार करण्यासाठी येशूवर विश्वास ठेवा.

२. आपल्या जीवनातील आनंद पुनर्संचयित करण्यासाठी येशूवर विश्वास ठेवा.

३. चमत्कार आपल्याला येशूकडे निर्देशित करतात आणि त्याच्यावर विश्वास ठेवण्यास मदत करतात.

| ९ मार्च २०२५ | माहान लेंटचा दुसरा रविवार (कुष्ठरोग्याला बरे करणे)<br>१९ वा रविवार | | |
|---|---|---|---|
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| २ राजे ५:१-१४ | स्तोत्र ५१:१-१७ | रोमकरास पत्र ३:२७–४:५ | संत.लुक ४:४०-४१, ५:१२-१६ |

**शुभवर्तमान विषय : येशू बहिष्कृत लोकांना आलिंगन देतो**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

येथे येशू एका कुष्ठरोग्यांला बरे करतो, जो नंतर एक शक्तिशाली साक्षीदार बनतो कारण लोक येशूचे ऐकण्यासाठी आणि त्याच्याद्वारे बरे होण्यासाठी येतात.

**यातून आपण काय शिकतो?**

येशूने सर्वांचे स्वागत केले आणि आलिंगन दिले; विशेषतः ज्यांना समाजाने नाकारले होते. आपण येशूला स्पर्श करताना आणि कुष्ठरोग्यांना पूर्ण बरे करताना पाहतो, अशा प्रकारे परमेश्वराचेप प्रेम प्रत्येकाची काळजी घेतो हे दर्शवितो.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. समाजातील बहिष्कृत लोकांचा शोध घ्या - गरीब, विधवा, कुष्ठरोगी, बेघर आणि अवांछित; आपण त्यांना येशूच्या प्रेमाने स्पर्श करू या.

२. परमेश्वराने आपल्यासाठी जे काही केले आहे त्याचे आपण शक्तिशाली साक्षीदार होऊ या.

३. जेव्हा आपण इतरांची सेवा करतो तेव्हा आपण त्यांच्यासाठी 'येशू' बनतो.

| | | | |
|---|---|---|---|
| **१६ मार्च २०२५** | | **माहान लेंटचा तिसरा रविवार (पक्षघात झालेल्यांना बरे करणे)** | |
| | **२० वा रविवार** | | |
| | **पवित्र शास्त्र वाचन** | | |
| २ राजे २:१-११ | स्तोत्र २२:२३-३१ | रोमकरास पत्र ५:१-११ | संत. मार्क २:१-१२ |

**शुभवर्तमान विषय : येशू पापांची क्षमा करतो आणि आपल्या शरीराला बरे करतो**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

चार मित्र पक्षाघात झालेल्या माणसाला येशूकडे घेऊन येतात. तो त्याच्या पापांची क्षमा करतो आणि त्याला बरे करतो. हा चमत्कार पाहून अनेकांना आश्चर्य वाटते, तर अनेकांना आश्चर्य वाटते की येशू पापांची क्षमा कशी करू शकतो.

**यातून आपण काय शिकतो?**

विश्वास, वैयक्तिकरित्या किंवा इतरांचा तुम्हाकरता विश्वास असला तरीही, देवाकडून आरोग्य आणि तारण प्राप्त करण्यासाठी महत्वाचे आहे. ख्रिस्त केवळ आपल्या शरीरांना बरे करण्यासाठी नाही तर आपल्या पापांची क्षमा करण्यासाठी आणि आपल्या आत्म्याला बरे करण्यासाठी या जगात आला.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. पक्षाघात झालेल्या माणसाच्या चार मित्रांनी अनेक अडथळ्यांवर मात करून त्याला येशूकडे आणले, त्याचप्रमाणे आपणही इतरांना ख्रिस्ताकडे आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत.

२. आपण विश्वास ठेवला पाहिजे आणि इतरांसाठीहि विश्वास ठेवला पाहिजे - त्यांच्या आरोग्यसाठी आणि तारणासाठी.

३. परमेश्वराचे बरे करणे हे सर्वांगीण आहे - शरीर, प्राण आणि आत्मा.

<table>
<tr><td colspan="4">**२३ मार्च २०२५**     **माहान लेंटचा चौथा रविवार**<br>**( कनानी स्रीला बरे करणे)**<br>**२१ वा रविवार**</td></tr>
<tr><td colspan="4">**पवित्र शास्त्र वाचन**</td></tr>
<tr><td>यशया ५६:१-७</td><td>स्तोत्र १९</td><td>रोमकरास पत्र ७:१४-२५</td><td>संत मत्तय १५:२१-२८</td></tr>
</table>

**शुभवर्तमान विषय :** महान विश्वासाचे उदाहरण

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

एक आई जिच्या मुलीला भुतांनी त्रास दिला आहे ती तिच्या मुलीसाठी दया आणि बरे करण्यासाठी येशूकडे येते. येशूने ख्रिस्ताच्या बरे करण्याच्या क्षमतेवर तिच्या गाढ विश्वासाची प्रशंसा केली.

**यातून आपण काय शिकतो?**

परमेश्वर नेहमी आपल्या विश्वासावर संतुष्ट असतो [इब्री. ११:६]. आणि जेव्हा आपण त्याच्याकडे विश्वासाने जातो तेव्हा तो आपल्या प्रार्थना कधीही अनुत्तरीत ठेवणार नाही आणि आपल्यावर दया दाखवेल.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. जर आपल्या प्रार्थनांचे उत्तर मिळाले नाही तर आपण हार मानू नये. पण, या आईच्या उदाहरणाप्रमाणे आपण चिकाटीने वागले पाहिजे.

२. आपल्या प्रिय व्यक्तीसाठी येशूवर विश्वास ठेवा, की तो त्यांच्यावर दया करेल.

३. प्रार्थना करा आणि तुमचा विश्वास वाढवा, जेणेकरून तुम्ही कोणत्याही परिस्थितीत विश्वास ठेवू शकता.

| २५ मार्च २०२५, मगळवार<br>**थियोटोकोसच्या घोषणेचा सण**<br>**(सुबोरो)** | | | |
|---|---|---|---|
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| उत्पत्ति २८:१०-२२ | स्तोत्र ४०:५-१० | इब्री लोकांस २:११-१८ | संत लूक १:२४-३८ |

**शुभवर्तमान विषय : आज्ञापालानाचा आत्मा विकसित करने**

**हा सण काय आहे?**

हा सण देवदूत गब्रीएलने कुमारी मरियेला येशू ख्रिस्ताच्या जन्माबद्दल दिलेल्या घोषणेचा सण आहे. ज्या मध्ये जगाच्या तारणासाठी आपल्या एकुलत्या एका पुत्राला पृथ्वीवर पाठवण्याकारिता परमेश्वराचे अभिवचन पुर्ण होण्याची सुरुवात ह्या सणापासुन होते.

**यातून आपण काय शिकतो?**

तारण हि देवाचा योजना होती. ख्रिस्त जन्माची घोषणा आणि याप्रकारे मानवी देह धारणला मानवजातीच्या तारणासाठी परमेश्वरानेच योजना केली होती. तरीही, त्याच वेळी, आपण हे देखील पाहतो की जेव्हा मरियेने परमेश्वराची इच्छा स्वीकारली तेव्हा मानवी सहभगीता जुळलेली दिसते.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. माता मरियेने आपल्यासमोर ठेवलेल्या महान उदाहरणाचे अनुसरण करा आणि आज्ञाधारकपणाची भावना विकसित करा, जरी त्याची इच्छा कठीण किंवा अनिश्चित वाटत आसली तरी.

२. परमेश्वराच्या निर्देशांना नम्रतेने स्वीकार करणे आणि त्यासाठी समर्पित असणे हाच मुक्ती आणि आशीर्वादाचा मार्ग आहे.

३. आम्हाला पृथ्वीवरील परमेश्वराच्या कार्यात सक्रियपणे सहभागी होण्यासाठी बोलावण्यात आले आहे - शब्द आणि कृती दोन्हीद्वारे - हे जाणून घेत कि परमेश्वर मानवी सहकार्यने कार्य करतो.

| ३० मार्च २०२५ | | | माहान लेंटचा ५ वा रविवार<br>(अपंग स्त्रीला बरे करणे) |
|---|---|---|---|
| | २२ वा रविवार | | |
| | पवित्र शास्त्र वाचन | | |
| यशया ५०:१-५ | स्तोत्र १०७:१–३, १७–२२ | १ पेत्र ३:८-१६ | संत लुक १३:१०-१७ |

**शुभवर्तमान विषय : आपण दयाळू व्हावे अशी परमेश्वराची इच्छा आहे.**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

येशू शब्बाथाच्या दिवशी एका स्त्रीला बरे करतो. जेव्हा संतप्त सभास्थानाचा शासक येशूवर त्यांची परंपरा मोडण्याचा आरोप लावतो, तेव्हा तो त्यांचा ढोंगीपणा उघड करतो.

**यातून आपण काय शिकतो?**

नियम आणि कायदे चांगले असले तरी, त्यांनी आपल्या सभोवतालच्या लोकांच्या गरजांबद्दल आपल्याला आंधळे आणि असंवेदनशील बनवू नये. मानवांचे कल्याण हे आपल्या सर्व आध्यात्मिक विषयांचे केंद्रबिंदू असले पाहिजे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. प्रार्थना, उपवास आणि दान यासारख्या आध्यात्मिक शिस्ती आपण माहान लेंटच्या हंगामात पालन करतो त्या आपल्याला नम्र बनवायला पाहिजे. आपल्या जिवनाच्या आत पहा आणि स्वतःचे मूल्यांकन करा. ह्या शिस्ती (नियम) मला इतरांसाठी अधिक दयाळू बनवत आहेत का? [संत मत्तय १२:७].

२. आपण परुश्यांसारखे गर्विष्ठ आणि स्वधर्मी होऊ नये, पण आपल्या आध्यात्मिक अभिमानाबद्दल पश्चात्ताप करावा आणि कि पुन्हा एकदा लहान बाळका समान बनण्यास देवाला सांगा. [संत मत्तय १८:३]

३. माहान लेंटच्या या हंगामात चर्चसोबत सहभगि होऊन आध्यात्मिक शिस्तीचे सातत्याने पालन करा.

| ६ एप्रिल २०२५ | | माहान लेंटचा ६ वा रविवार (आंधळ्या मानसाला बरे करणे) २३ वा रविवार | |
|---|---|---|---|
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| अनुवाद: २५:१३-१६; २६:१-१३ | स्तोत्र ११९:९-१६ | इफिसकरास पत्र ५:१-१४ | संत योहान ९:१-४१ |

**शुभवर्तमान विषय : दृष्टी देणे**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

येशू जन्मापासून आंधळा असलेल्या माणसाला बरे करतो. तो नंतर साक्ष देतो, परमेश्वराने त्याच्यासाठी अविश्वासू परुश्यांसाठी काय केले आहे. येथे शेवटी येशू स्वतःला त्या माणसासमोर प्रकट करतो ज्याला दृष्टी प्राप्त झाली होती.

**यातून आपण काय शिकतो?**

एखाद्याचे स्वतःचे पाप किंवा एखाद्याच्या पालकांचे पाप नेहमीच दुःख आणि आजारपणाचे कारण नसते. या 'सर्जनशील' चमत्काराद्वारे, आपण पाहतो की येशू खरोखरच परमेश्वर आहे आणि बरे झालेल्या माणसाकडून आपण प्रभावी ख्रिस्ती साक्षीदार कसे व्हावे हे शिकतो.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. येशूबद्दलची आपली साक्ष कदाचित छळ आणि विरोधांना आमंत्रण देऊ शकते.

२. प्रत्येक परिस्थितीत धाडस, धैर्यवान, आत्मविश्वास यासाठी प्रार्थना करा. आणि येशूसाठी खंबीर राहा.

३. तरीसुद्धा, परमेश्वराने आपल्यासाठी जे काही केले आहे ते आपण दुसऱ्यांना सांगितले पाहिजे, जेणेकरून येशू खरोखर कोण आहे हे इतरांना दिसेल.

| **१३ एप्रिल २०२५** | | **होसन्ना/ झावळ्याचा रविवार** | |
|---|---|---|---|
| **२४ वा रविवार<br>झावळ्याचा रविवारचा सण** | | | |
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| मीखा ४:१-५ | स्तोत्र ११८:१–२, १९–२९ | रोमकरास पत्र ८:१८-२५ | संत योहान १२:१२-१९ |

**शुभवर्तमान विषय : सेवक राजा**

**हा सण (उत्सव) कशाबद्दल आहे?**

येशू गाढवावर स्वार होऊन येरुशलेममध्ये प्रवेश करतो आणि मोठ्ठा लोकसमुदाय झावळ्याच्या पानांनी आणि होसन्ना ओरडून त्याचे राजासारखे स्वागत करतो.

**यातून आपण काय शिकतो?**

पवित्र सप्ताहात प्रवेश करण्यापूर्वी, पृथ्वीवरील येशूच्या जीवनाच्या शेवटच्या आठवड्यात येशूने आपल्याविषयीच्या भविष्यवाण्या पूर्ण केल्या. लोक येशूला राजकीय दडपशाहीतून सोडवायला आलेला माणूस म्हणून पाहत होते. पण पृथ्वीवरील राजासारख्या घोड्याऐवजी गाढवावर स्वार होऊन येणारा येशू त्या शाश्वत राज्याकडे निर्देश करतो ज्याची स्थापना करण्यासाठी तो आला आहे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आपण नम्र होऊन ख्रिस्ताप्रमाणे इतरांची सेवा करू या. त्यांनी सांगितले आणि दाखवून दिले की, सर्वांपेक्षा श्रेष्ठ सर्वांचा सेवक आहे. तो आपला सेवक-राजा आहे.

२. आश्चर्यचकित होऊ नका जे लोक आता आमले स्वागत करत आहेत ते नंतर आमच्या विरोधात जातील. कारण हेच आमचे गुरु येशू यांच्या बरोबर झाले आहे.

३. आजच्या काळातील वैभव किंवा दुःखांवर नाही तर आपल्या गौरवशाली भविष्यावर आपला विश्वास आणि आशा ठेवण्यास शिका.

| २० एप्रिल २०२५ | | इस्टर रविवार (किम्थो) | |
|---|---|---|---|
| २५ वा रविवार<br>इस्टरचा सण | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| प्रेषितांची कृत्ये २:२२-३६ | स्तोत्र १६ | रोमकरास पत्र ८:१८-२५ | संत मत्तय २८: १-२० |

**शुभवर्तमान विषय : मृत्यूचा पराभव**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

येशूचे शिष्य त्याच्या पुनरुत्थानाचे आणि मृत्यूला पराभुत करण्याचे साक्षीदार बनले, परंतु येशूला विरोध करणारे सत्य लपवण्याचा प्रयत्न करत होते. त्यानंतर, येशू त्याच्या शिष्यांना महान आज्ञा देतो.

**यातून आपण काय शिकतो?**

इस्टर (येशु ख्रिस्ताचे पुनरुत्थान) ही इतिहासातील सर्वात मोठी घटना आहे – कारण येशूने मृत्यूला हरवले! पुनरुत्थानाशिवाय आपला विश्वास व्यर्थ आहे [ १ करिंथकरास पत्र १५:१४] आणि ख्रिस्ताचे पुनरुत्थान आपल्याला धैर्य देते, आपण सर्व राष्ट्रांमध्ये जायला पाहिजे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आपल्याला आता मृत्यूची भीती बाळगण्याची गरज नाही, कारण येशूने मृत्यूला हरवले आहे.

२. या हंगामात आम्ही एकमेकांना म्हणतो: ख्रिस्त उठला आहे! तो खरोखर उठला आहे!

३. आम्हाला असलेल्या आशेची ही बातमी आम्ही इतरांना सागितली पाहिजे.

| **२७ एप्रिल २०२५** | | **नवीन रविवार**<br>**युवा रविवार - विशेष अर्पण** | |
|---|---|---|---|
| | **२६ वा रविवार** | | |
| | **पवित्र शास्त्र वाचन** | | |
| यशया ४०:९-१५ | स्तोत्र १३३ | २ तीमथ्य २:१-१३ | संत योहान २०:१९-३१ |

**शुभवर्तमान विषय : आपले भय आणि शंकांवर मात करणे**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

पुनरुत्थित येशू भयभीत शिष्यांना प्रकट होतो. तो त्यांना शांती देतो, त्यांना पवित्र आत्म्याचे वचन देतो आणि पापांची क्षमा करण्याची शक्ती देतो. तो दुसऱ्यांदा येतो, संत थोमाच्या शंका दूर करतो, जो त्याला 'माझा प्रभु आणि माझा परमेश्वर' म्हणून कबूल करतो.

**यातून आपण काय शिकतो?**

आपल्याबरोबर उठलेल्या ख्रिस्ताची उपस्थिती आपल्यातिल सर्व भीती दूर करते. येशू त्याच्या शिष्यांना त्याची याजाकीय सेवा चालू ठेवण्यासाठी आणि संत थोमाच्या शंकांना विश्वासाच्या सखोल कबुलीमध्ये बदलतो.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आम्ही घाबरतो का? लक्षात ठेवा की पुनरुत्थान झालेला ख्रिस्त आपल्यासोबत आहे! [संत मत्तय २८:२०]

२. आम्हाला शंका आहे का? जेव्हा आपण ते कबूल करतो तेव्हा परमेश्वर आपल्याला अधिक विश्वास ठेवण्याकडे जाण्यासाठी त्याचा वापर करू शकतो.

३. जे भयभीत आणि संशयास्पद दिसतात त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नका, त्यांचा करू नका किंवा त्यांचा न्याय करू नका. परमेश्वर त्यांना बदलू शकतो आणि शिष्यांप्रमाणेच त्याच्या गौरवासाठी वापरू शकतो.

*** संत थोमा, जो शंका करत होता, नंतर परमेश्वरद्वारे अनेक देशात, विशेषकरून भारतात येशू ख्रिस्ताचे शुभवर्तमान आणण्यासाठी वापरला गेला, जिथे त्याने शहीद म्हणून आपले प्राण दिले.**

| ४ मे २०२५ | | नवीन रविवारा नंतरचा पहिला रविवार<br>२७ वा रविवार | |
|---|---|---|---|
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| यहोशवा ६:९-२१ | स्तोत्र ४ | इफिसकरास पत्र ६:१०-२४ | संत. योहान २१:१-१४ |

**शुभवर्तमान विषय : आपले पाचारण कधीही सोडू नका**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

शिष्यांना पूर्ण रात्र मासे पकडण्यास असफलता मिळाल्यानंतर, पुनरुत्थान झालेला ख्रिस्त त्यांना मास्यांना चमत्कारिक रीतीने पकडण्यास त्यांना निर्देश देतो आणि त्यांना स्वतःला पत्यांच्या समोर प्रकट करतो.

**यातून आपण काय शिकतो?**

हा चमत्कार शिष्यांना येशूने केलेल्या पहिल्या चमत्कारांची आठवण करून देतो [संत. लूक ५:१-११] आणि अशा प्रकारे त्यांनी त्यांच्या पाचारणाची आठवण करून देतो - माणसे धरणारे व्हा [ संत. मतय ४:१९]. प्रचंड मासे पकडले जाने ही देखील शिष्यांद्वारे लोकांना परमेश्वराच्या राज्यात आणण्याचे प्रतिक आहे.

**आपण हे कसे लागू कारणार?**

१. जर तुम्ही तुमच्या पाचारणातून माघारी जाण्याच्या परीक्षेत पडला असाल, तर येशू आम्हाला मनुष्यांना धरणारे बनण्याच्या पाचारणाची आठवण करून देत आहे.

२. आम्ही जे त्याचे शिष्य आहोत, आमच्या माध्यमातूनच सर्व मानवजातीने येशूबद्दल जाणून घेतले पाहिजे.

३. जे लोक ख्रिस्ताच्या जीवनातून परत गेले आहेत त्यांच्यासाठी प्रार्थना करा; जेणेकरून ते त्याच्या प्रेमाकडे आणि पाचारणाकडे परत येऊ शकतील.

| ११ मे २०२५ नवीन रविवारा नंतरचा दुसरा रविवार<br>२८ वा रविवार | | | |
|---|---|---|---|
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| प्रेषितांची कृत्ये ४:८-२१ | स्तोत्र १०० | इब्री लोकांस पत्र ३:१-१३ | संत. योहान २१:१५–२२ |

**शुभवर्तमान विषय : येशुने आम्हला पुन्हा स्थापित करतो**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

येशू संत पेत्राला पुन्हा स्थापित करतो ज्याने त्याला तीन वेळा नाकारले होते [ संत लुक २२:३१] भविष्यवाणी केली कि भविष्यात तो त्याच्या गुरुसाठी आपला जीव कसा देईल.

**यातून आपण काय शिकतो?**

येशू सर्वांना पुन्हा स्थापित करण्याचा प्रयत्न करतो; अगदी त्यांना देखील जे त्याला नाकारतात आणि नंतर त्यांनाच सर्वोच्च जबाबदारी देतो, जसे आपण बघतो कि संत पेत्राला त्याच्या कळपाचे पालनपोषण करण्याची जबादारी देतो. येशूचे प्रेम कोणालाही बदलू शकते - जसे त्याने संत पेत्रराला इतके बदलले की, तो त्याच्या गुरुसाठी आपला जीव देण्यास तयार होता.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. येशूच्या प्रेमाच्या आवाक्याबाहेर कोणीही नाही.

२. जर आपण पश्चात्ताप केला आणि त्याचे प्रेम स्वीकारले तर येशू आपल्याला त्याच्या शिष्यांच्या समुदायात परत आणेल.

३. प्रार्थना करा आणि कठोर परिश्रम करा की आपण आपल्या मृत्यूच्या वेळिहि येशूचे विश्वासू साक्षीदार होऊ.

| १८ मे २०२५ नवीन रविवारा नंतरचा दुसरा रविवार<br>२९ वा रविवार | | | |
|---|---|---|---|
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| निर्गम ३४:४-१२ | स्तोत्र २२:२५-३१ | १ योहान ५:१३-२१ | संत लूक २४:१३-३५ |

**शुभवर्तमान विषय** : पवित्र शास्त्र आणि प्रभुभोज येशूला अधिक जाणून घेण्यासाठी आपले डोळे उघडतात.

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

इमाऊसच्या वाटेवर असलेल्या दोन शिष्यांसोबत चालत असताना, येशू प्रथम माशिहा संबंधित वचनांचे स्पष्टीकरण देतो. मग जसा तो त्यांच्याबरोबर भाकरी तोडतो, तो त्यांना स्वतःला प्रकट करतो.

**यातून आपण काय शिकतो?**

जेव्हा आपण पवित्र शास्त्र वाचतो, ऐकतो आणि शिकवतो तेव्हा ते आपल्याला दोषी ठरवते आणि आपल्याला ख्रिस्ताकडे आणते. आपण हे देखील शिकतो की, जेव्हा आपण पवित्र युकेरिस्ट/प्रभूभोज (भाकरी मोडणे) मध्ये भाग घेतो तेव्हा येशूला जाणून घेण्यासाठी आपले डोळे उघडले जातील.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. पवित्र शास्त्र वाचणे, ऐकणे आणि शिकणे ही आपली सवय असली पाहिजे.

२. जेव्हा आपण निराश किंवा गोंधळलेले असतो, तेव्हा या दोन शिष्यांप्रमाणेच, पवित्र शास्त्रच्या वचनांचे वाचन करा. ते आम्हाला दोषी ठरवेल आणि येशूकडे निर्देशित करेल

३. आपण नियमितपणे पवित्र प्रभुभोजमध्ये भाग घेतला पाहिजे. त्यातच आणि त्यातूनच, येशूला अधिक जाणून घेण्यासाठी आणि त्याच्या दैवी स्वरूपाचे सेवन करण्यासाठी आपल्या अंतःकरणाचे डोळे उघडले जातील [२ पेत्र १:४].

| | | | |
|---|---|---|---|
| **२५ मे २०२५** | | **नवीन रविवारा नंतरचा चौथा रविवार** | |
| **30 वा रविवार** | | | |
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| यशया ५४:१-८ | स्तोत्र ९८ | १ पेत्र ३:१७-२२ | संत लूक ९:५१-६२ |

**शुभवर्तमान विषय : येशूचा शिष्य असण्याची किंमत**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?** येशुने येरुशलेमला जाण्याचा आणि दु:ख सहन करण्याचा दृढपणे निच्चय केला, तेथे तीन व्यक्ती आहेत जे त्याचे अनुसरण करण्याची इच्छा व्यक्त करतात. येशू त्यांना सांगतो की त्याचे अनुसरण करण्यासाठी त्यांना काय किंमत मोजावी लागेल.

**यातून आपण काय शिकतो?**जरी आपल्याला येशूचे अनुसरण करण्याची इच्छा असली तरी अनेकदा आपण त्याची किंमत मोजत नाही. परंतु येथे येशू आपल्याला ह्याची किंमत मोजून आणि पूर्ण निष्ठेने त्याला अनुसरण्याचे समर्पण करण्याचे आव्हान देत आहे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. जर आपण पृथ्वीवरील सुरक्षिततेबद्दल विचार केला तर आपण येशूचे मनापासून अनुसरण करू शकणार नाही [ वचन ५८].

२. हे समजून घ्या की ख्रिस्ताप्रती आपली वचनबद्धता पूर्ण करण्यात आपल्या मार्गात काहीही अडखळन ठरू नये, अगदी आपले पालक सुद्धा नाही [वचन 59].

३. आपण मागे जाऊ नये, परंतु विलंब न करता पुढे जावे [वचन ६१].

| २९ मे २०२५ गुरुवार<br>आमच्या प्रभूच्या स्वर्गरोहणाचा सण | | | |
|---|---|---|---|
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| प्रेषितांची कृत्ये १:१-११ | स्तोत्र ४७ | इफिसकरास पत्र १:१५-२३ | संत. लूक २४:३६-५३ |

**शुभवर्तमान विषय** : ख्रिस्त परत येईल, जसे तो वर गेला होता!

**हा सण कशाबद्दल आहे?**
हा सण आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानानंतर आपल्या शिष्यांसोबत ४० दिवस घालवल्यानंतर त्याच्या स्वर्गारोहणाला स्मरण म्हणून साजरा केला जातो.

**यातून आपण काय शिकतो?**
**आशेचा सण** - येशूचे पुनरुत्थान आणि स्वर्गात स्वर्गारोहण झाल्यामुळे, आपण मृत्यूकडे आशेने पाहतो - स्वर्गाचे दार म्हणून.

**आनंदाचा सण** - कारण येशूने पवित्र आत्म्याला आपल्यामध्ये राहण्यासाठी आणि आपल्याला सत्याच्या व जीवनाच्या मार्गावर मार्गदर्शनसाठी करण्यासाठी पाठविला आहे.

**वाट पाहण्याची मेजवानी** - कारण ते आपल्याला येशूच्या दुसऱ्या आगमनाची आठवण करून देते. म्हणून आम्ही वाट पाहतो आणि स्वतःला शुद्ध आणि पवित्र ठेवण्याचा प्रयत्न करतो, जेणेकरून जेव्हा तो येईल तेव्हा तो आपल्याला त्याच्या येण्याची वाट पाहणारे विश्वासू सेवक म्हणून सापडेल.

**आपण हे कसे लागू कारणार?**

१. आता मृत्यूला घाबरण्याची गरज नाही!

२. पवित्र आत्म्याला सांगा कि तो आपल्याला आमच्या’ प्रभु येशूचे प्रभावी साक्षीदार होण्यासाठी समर्थ बनवेल.

३. येशूच्या दुसऱ्या आगमनासाठी नेहमी तयार रहा.

| १ जून २०२५ | | पन्नसव्या दिवसा ( पेन्टेकॉस्टच्या) आधीचा रविवार<br>३१ वा रविवार | |
|---|---|---|---|
| **पवित्र शास्त्र वाचन** | | | |
| यहोशवा १:५-९ | स्तोत्र १ | १ करिंथकरास पत्र ७:१-२, २५-३४, ९:१-१० | संत. योहान १७:१३-२६ |

**शुभवर्तमान विषय : एकतेसाठी प्रार्थना**

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

येशूला अटक होण्याआधी आणि त्याची परीक्षा घेण्यापूर्वी, तो एकटाच पित्याला प्रार्थना करतो – प्रथम त्याच्या शिष्यांसाठी आणि नंतर त्यांच्यासाठी जे शिष्यांद्वारे त्याच्यावर विश्वास ठेवतील.

**यातून आपण काय शिकतो?**

जरी आम्ही ख्रिस्ती या नात्याने या जगात राहत असलो तरी आम्ही या जगाचे नाहीत. 'आपण सर्व एक होऊ' ही येशूची सर्वात मोठी प्रार्थना होती - म्हणजे. – विश्वासणाऱ्यांमध्ये खरी एकता, कारण ह्याच द्वारे इतर लोक येशूवर विश्वास ठेवतील.

**आपण हे कसे लागू कारणार?**

१. जगाला येशूबद्दल जाणून घेण्यास मदत करण्यासाठी आम्हाला जगात पाठवले आहे [वचन १८].

२. जरी जग आपला द्वेष करेल, पण परमेश्वर दुष्टापासून आपले रक्षण करेल [वचन १४,१५].

३. आपण एकमेकांशी एकरूप होण्याचा प्रयत्न केला पाहिजे; अशाने इतर लोक येशूला ओळखतील [वचन २१] कि आम्ही त्याचे आहोत.

| | |
|---|---|
| **८ जून २०२५** | **पेन्टेकॉस्ट (पुनरूत्थाना नंतरचा पन्नासावा दिवस)**<br>**मिशन रविवार - विशेष दान** |
| **३२ वा रविवार** | |

**पवित्र शास्त्र वाचन**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रेषितांचीकृत्ये २:१-२१ | स्तोत्र १०४:२४–३४, ३५ब | गलतीकरास पत्र ५:१६-२६ | संत योहान १६:१-१५ |

**शुभवर्तमान विषय :** पवित्र आत्मा आमचा सहाय्यक

**हा शास्त्र भाग कशाबद्दल आहे?**

येशू आपल्या शिष्यांना सांगतो की तो त्यांना सोडून जात आहे आणि त्यानंतर पवित्र आत्मा यईल त्यांच्याबरोबर कायमचा राहील [संत योहान १४:१६] आणि तो त्यांना सर्व सत्याचे मार्गदर्शन करेल [वचन १३].

**यातून आपण काय शिकतो?**

पवित्र आत्मा आपला सहाय्यक आहे – आमचा सांत्वन करणारा, आमचा सल्लागार आणि आमचा मार्गदर्शक. पवित्र आत्मा आपल्याबरोबर उपस्थित आहे आणि सत्याचा आत्मा आहे जो परमेश्वराची ओळख करून देतो आणि जगाला खात्री देतो.

**आपण हे कसे लागू कारणार?**

१. जेव्हा आपण येशूचे अनुसरण करतो, तेव्हा आम्ही छळाची अपेक्षा करू शकतो [वचन १-३].

२. जेव्हा आपल्याला वाटते की आपण एकटे आहोत, तेव्हा सांत्वन करणारा, आपला मदतनीस, पवित्र आत्मा नेहमी आपल्याबरोबर असतो हे लक्षात ठेवावे. [वचन ६,७]

३. पवित्र आत्मा आपल्याला संपूर्ण जगाला सत्याचा शक्तिशाली साक्षीदार होण्यासाठी सामर्थ्य देण्यासाठी दिलेला आहे. [प्रेषितांची कृत्ये २:११]

| १५ जुन २०२५ | | पेंटेकॉस्ट नंतरचा पहिला रविवार | |
|---|---|---|---|
| | ३३ वा रविवार | | |
| | पवित्र शास्त्र वाचन | | |
| यिर्मया २९:१०-१६ | प्रेषितांची कृत्ये १७:१०-१५ | २ करिंथ ५:१४–६:१० | संत योहान ६:२६-३५ |

**शुभवर्तमान विषय :** येशू जीवनाची भाकर आहे

**हा शास्त्रभाग कशाबद्दल आहे?**

अनेकांनी येशूचे अनुसरण केले जेव्हा त्याने केवळ पांच भाकरीने महिला आणि लहान मुलांशिवाय ५००० पुरुषांना भोजन खायला दिले. येशू त्यांना अनंतकाळ टिकणारे अन्न शोधण्याचे निर्देश देतो, म्हणजे तो स्वतःच, आणि तो घोषित करतो की तोच स्वर्गातील खरी भाकर आहे, परमेश्वराची भाकर जी जगाला जीवन देते.

**यातून आपण काय शिकतो?**

चिन्हे शोधू नका; त्याऐवजी ही चिन्हे ज्याला सूचित करतात त्याला शोधा - येशू. त्याच्यावर विश्वास ठेवा आणि तो आपली आध्यात्मिक भूक आणि तहान कायमची पूर्ण करेल.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. जेव्हा आपल्याला आशीर्वाद आणि चमत्कार मिळतात, तेव्हा सर्व आशीर्वादांचा स्रोत असलेल्या देवाला विसरू नका.

२. येशूचे अनुसरण करा आणि त्याचा शोध घ्या कारण तो अनंतकाळच्या जीवनाचा स्रोत आहे.

३. नियमितपणे पवित्र प्रभुभोज मध्ये भाग घ्या, कारण येशू या विधीद्वारे स्वतःला दआम्हाला देतो. [संत योहान ६: ५१, ५३].

| २२ जुन २०२५ | | पेंटेकॉस्ट नंतरचा दुसरा रविवार | |
|---|---|---|---|
| ३४ वा रविवार | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| दानीएल ६:२५-२८ | प्रेषितांची कृत्ये ४:२३-३१ | इफिस २:११-२२ | संत मत्तय १०:५-१६ |

**शुभवर्तमान विषय : उपदेश आणि बरे करण्यासाठी पाठवले गेले आहोत**

**हा शास्त्रभाग कशाबद्दल आहे?**

[संत लूक ९:१-६ देखील पहा]

येशू स्पष्ट सूचना देतो - काय घ्यावे, कुठे जायचे, कसे प्रतिसाद द्यायचे, जेव्हा तो त्याच्या शिष्यांना परमेश्वराच्या राज्याचा प्रचार करण्यासाठी आणि आजारी लोकांना बरे करण्यासाठी पाठवतो.

**यातून आपण काय शिकतो?**

येशूची सेवा उपदेश करणे आणि बरे करणे हि होती. हे आता त्याच्या शिष्यांना दिले गेले आहे, ज्यांना या सेवेमध्ये एकल मनाने 'जाणे' आवश्यक आहे आणि त्यांना येशूकडून जे मिळाले आहे ते मुक्तपणे सामायिक करणे आवश्यक आहे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. येशूचे शिष्य या नात्याने, शब्द आणि कृतींनी आपणाला प्रचार आणि बरे करण्यासाठी बोलावले जात आहे.

२. आपण आपल्या उद्देशातून विचलित होऊ नये. परमेश्वर आपल्या सर्व गरजा पूर्ण करेल.

३. ज्यांना ते मिळते त्यांच्यासाठी आम्ही शांती आणि क्षमा वाहक आहोत.

| २९ जुन २०२५ | | पन्नसव्या दिवसा (पेंटेकॉस्ट) नंतरचा तिसरा रविवार<br>सेमिनरी रविवार - विशेष दान | |
|---|---|---|---|
| ३५ वा रविवार | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| यिर्मया ३:१-५ | प्रेषितांची कृत्ये १३:२६-३९ | गलती ६:१०-१८ | संत योहान ६:३५-४६ |

**शुभवर्तमान विषय : पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी पाठवले आहे**

**हा शास्त्रभाग कशाबद्दल आहे?**

या शास्त्रभागात, येशू पुन्हा एकदा सांगतो की तो स्वर्गातून आलेली भाकर आहे, पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी, यहुद्यांना तो खरोखर कोण आहे याबद्दल गोंधळात टाकतो.

**यातून आपण काय शिकतो?**

आपण शिकतो की येशू दैवी आहे; की तो देवाचा पुत्र आहे, जीवन देणारी भाकर, जी स्वर्गातून पाठवली आहे. परमेश्वर पित्याची इच्छा अशी आहे की सर्वांना त्याचा पुत्र येशू ख्रिस्ताद्वारे सार्वकालिक जीवन मिळावे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. येशूप्रमाणे, आपण आपल्या जीवनात पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी आपली इच्छा समर्पित केली पाहिजे.

२. इतरांना येशूला पाहण्यास आणि त्याच्यावर विश्वास ठेवण्यास मदत करा - हाच एकमेव मार्ग आहे ज्याने त्यांना सार्वकालिक जीवन मिळू शकते.

३. पवित्र प्रभुभोजच्या विधीत भाग घेतल्याने अनंतकाळचे जीवन बळकट आणि पोषण होते. प्रभुभोजमध्ये येशू भाकर आणि द्राक्षारद्वारे स्वतःला देतो.

| ६ जुलै २०२५ | | पेंटेकॉस्ट नंतरचा चौथा रविवार | |
|---|---|---|---|
| ३६ वा रविवार | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| यशया ६५:८-१२ | प्रेषितांची कृत्ये ६:१-७ | १ करिंथ १६:१४–२२ | संत लूक १०:१-१६ |

**शुभवर्तमान विषय** : पिक कापणी आणि मजुरांची वास्तविकता

**हा शास्त्रभाग कशाबद्दल आहे?**

येशू त्याच्या ७० शिष्यांना उपदेश करण्यासाठी आणि बरे करण्यासाठी पाठवतो. तो त्यांना आठवण करून देतो की त्यांनी अनेकदा धोक्याच्या वेळी ही सेवाकार्य पुढे चालवायचे आहे. येशू त्यांना ख्रिस्त आणि त्याची कृत्ये नाकारण्याच्या धोक्याबद्दल देखील चेतावणी देतो.

**यातून आपण काय शिकतो?**

येशू म्हणतो की कापणी भरपूर आहे (ज्याचा सरळ अर्थ असा आहे की जगात बरेच लोक आहेत ज्यांना शुभवर्तमान ऐकण्याची आणि प्रतिसाद देण्याची गरज आहे). आणि म्हणून, कापणीसाठी अधिक मजुरांनी समर्पण करण्यासाठी आपण प्रार्थना करणे आवश्यक आहे. आणि या मोहिमेवर, आम्ही लांडग्यांमध्ये कोकरू म्हणून जात आहोत.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. ख्रिस्ताचे ध्येय पूर्ण करण्यासाठी परमेश्वराने आणखी कामगार उभे करावेत यासाठी सतत, जाणीवपूर्वक आणि नियमितपणे प्रार्थना करा.

२. आपण छळासाठी तयार असले पाहिजे आणि म्हणून सुभवर्तमानाच्या प्रचारात आपण खूप शहाणे असले पाहिजे.

३. आपण ज्यांनी परमेश्वराची पराक्रमी कृत्ये पाहिली आणि अनुभवली आहेत, त्यांनी नम्र राहण्याची आणि पश्चात्तापी जीवन जगण्याचे लक्षात ठेवूया.

| **१३ जुलै २०२५** | **पेंटेकॉस्ट नंतरचा पाचवा रविवार** <br> **३७ वा रविवार** | | |
|---|---|---|---|
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| यशया ४०:२७-३१ | प्रेषितांची कृत्ये ९:१०-१८ | २ करिंथकर ५:१४–२० | संत लूक ९:१०-१७ |

**शुभवर्तमान विषय** : आपल्या अपर्याप्ततेमध्ये परमेश्वराची शक्ती

**हा शास्त्रभाग कशाबद्दल आहे?**

[संत योहान ६:४-१४ देखील पहा] चारही शुभवर्तमानांमध्ये नोंदवलेल्या या चमत्कारात, येशू ५००० पुरुषांना (मुले आणि स्त्रिया सह) फक्त पाच भाकरी आणि दोन मासे खायला देतो, मानवी मर्यादांच्या पलीकडे परमेश्वराची क्षमता प्रदर्शित करतो.

**यातून आपण काय शिकतो?**

जेव्हा आपल्याला गरज असते आणि ती पूर्ण करण्यासाठी आपल्याकडे संसाधने नसतात तेव्हा आपल्याजवळ जे आहे ते येशूला द्या. आपच्या गरजा पूर्ण करण्यासाठी देवाला अजुन वाढवीन्यास ते पुरेसे असेल.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आपण त्याच्यावर विश्वास ठेवतो की नाही हे जाणून घेण्यासाठी त्याने आपल्या शिष्यांची जशी परीक्षा घेतली तशीच येशू आपली परीक्षा घेईल.

२. एखाद्या गरजेचा सामना करताना, काळजी करण्याऐवजी, ती पूर्ण करण्यासाठी देवावर विश्वास ठेवा.

३. जेव्हा परमेश्वर तुमचा वापर इतरांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी करतो, तेव्हा तो तुमच्या गरजाही पूर्ण करेल. लक्षात ठेवा, जेव्हा सर्वजण जेवून आणि संतुष्ट झाल्यानंतरही १२ टोपल्या भरून उरल्या होत्या.

| २० जुलै २०२५ | | पेंटेकॉस्ट नंतरचा सहावा रविवार | |
|---|---|---|---|
| ३८ वा रविवार | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| यशया १४:२२-२७ | प्रेषितांची कृत्ये १:१५-२० | १ करिंथकर ८:१–६ | संत मत्तय १५:३२-३९ |

**शुभवर्तमान विषय** : परमेश्वर आपल्या सर्व भौतिक गरजा पूर्ण करण्यास सक्षम आहे

**हा शास्त्रभाग कशाबद्दल आहे?**

लोकसमुदाला भोजन देण्याच्या दुसऱ्यां प्रसंगी, येशूने, त्यांना तीन दिवसांपासून काहीही खायला मिळालेले नाही हे पाहून, चमत्कार केला आणि स्त्रिया आणि लहान मुलांव्यतिरिक्त सात भाकरी द्वारे ४००० पुरुषांना खायला घातले.

**यातून आपण काय शिकतो?**

येशूला आपल्या आध्यात्मिक आणि शारीरिक गरजांचीही काळजी आहे. जेव्हा शिष्यांनी त्यांच्याजवळ असलेले थोडेसे येशूला दिले तेव्हा ते त्यांच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसे होते.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. प्रार्थना करा की आपण लोकांना येशूप्रमाणेच दयाळू डोळ्यांनी पाहू या.

२. आपल्यासमोर आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी थोडेच असल्यास निराश होऊ नका. येशूला जे काही दिले जाईल ते आपल्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी अजुन वाढविले जाईल.

३. आपल्या शिष्यांद्वारेच येशू आजूबाजूच्या लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो. आम्ही त्याचे हात आणि पाय आहोत.

| २७ जुलै २०२५ | | पेंटेकॉस्ट नंतरचा सातवा रविवार | |
|---|---|---|---|
| ३९ वा रविवार | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| यशया ५७:१५-१९ | प्रेषितांची कृत्ये ४:३२-३७ | इफिस २:११-२२ | संत मार्क ३:२०-३० |

**शुभवर्तमान विषय** : दुष्ट शक्तींवर येशूचा अधिकार

**हा शास्त्रभाग कशाबद्दल आहे?**

जेव्हा येशूने भूत काढले तेव्हा काही जण म्हणाले की त्याने शैतानाच्या सामर्थ्याने असे केले. येशू त्यांना प्रश्न विचारतो, एक दुष्ट राज्य स्वतःचा नाश कसा करू शकते, त्याने सांगितले तो सामर्थी मनुष्य आहे जो सामर्थी माणसाने बंदिवान केलेल्या लोकांना सोडवण्यासाठी आला आहे [संत लुक ११:२१,२२].

**यातून आपण काय शिकतो?**

येशू, देवाचा पुत्र, दुष्ट शक्तींच्या अधीन असलेल्यांना मुक्त करण्यासाठी आला. पण अशी चांगली कामे करत असतानाही, त्याच्या सामर्थ्याचा स्रोत आणि त्याच्या हेतूबद्दल अनेकांचा गैरसमज आहे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आपल्याला शैतानाच्या शक्तींना घाबरण्याची गरज नाही; येशू ख्रिस्त त्या सर्व शक्तींपेक्षा बलवान आहे.

२. दुष्टाने कैद केलेल्यांना येशूच्या नावाने सोडवण्याठी प्रार्थना करा.

३. जेव्हा काही परमेश्वराच्या कार्याचा गैरसमज करतात, प्रश्न करतात किंवा विरोध करतात तेव्हा निराश होऊ नका.

| ३ ऑगस्ट २०२५ | पेंटेकॉस्ट नंतरचा आठवा रविवार<br>४० वा रविवार | | |
|---|---|---|---|
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| यशया ५२:१-६ | स्तोत्र २३ | १ पेत्र २:४-१० | संत योहान ६:४७-५९ |

**शुभवर्तमान विषय : जीवन देणारे शरीर आणि येशूचे रक्त**

**हा शास्त्रभाग कशाबद्दल आहे?**

या शास्त्रभागमध्ये येशू दैवी प्रभुभोजच्या (पवित्र प्रभुभोज) मूलभूत तत्त्वाची स्थापना करत आहे.

**यातून आपण काय शिकतो?**

पवित्र प्रभुभोजमध्ये, आपण गूढपणे ख्रिस्ताचे मांस खातो आणि रक्त पितो. हे समजणे कठीण असले तरी, गूढदृष्ट्या, जेव्हा भाकर आणि द्राक्षरस आशीर्वादित केले जातात, तेव्हा ते ख्रिस्ताचे पवित्र शरीर आणि पवित्र रक्त बनतात. आणि जेव्हा आपण पवित्र तत्वे विश्वासाने घेतो, तेव्हा ते आपल्याला आध्यात्मिकरित्या नूतनीकरण करते आणि आपल्याला अनंतकाळचे जीवन देते.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. पवित्र प्रभुभोज हे चर्चचे केंद्रबिंदु आहे. याचा अर्थ ख्रिस्त आपल्याबरोबर आहे आणि आपल्यामध्ये आहे.

२. म्हणून, आपण दैवी प्रभुभोजनाला साधारन घेऊ नये किंवा कोणत्याही गोष्टीसाठी ते चुकवू नये.

३. आपण बाहेर जाऊ आणि जे आध्यात्मिकरित्या मरत आहेत त्यांना आणू या, जेणेकरून ते देखील येशूच्या जीवन देणाऱ्या शरीराचा आणि रक्ताचा भाग होऊ शकतील.

| ६ ऑगस्ट २०२५, बुधवार<br>**आमच्या प्रभूच्या रुपांतरचा उत्सव** | | | |
|---|---|---|---|
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| अनुवाद १६:१३-१७ | स्तोत्र २४ | १ योहान २:२३-३:१ | संत लुक ९:२७-३६ |

**शुभवर्तमान विषय : ख्रिस्ताच्या समानतेत रूपांतरित होने**

**ही  सण कशाबद्दल आहे?**

हा सण त्या चमत्काराचे स्मरण करतो जिथे आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताचे रूपांतर झाले होते, त्याचे देवत्व त्याच्या शिष्यांना प्रकट होते.

**यातून आपण काय शिकतो?**

यातून येशूचा दैवी स्वभाव प्रकट झाला आणि तो देवाचा प्रिय पुत्र आहे. आम्ही मोशे (जो मरण पावला होता) प्रगट होताना पाहतो आणि येशूशी बोलतो. हा पुरावा आहे की मृत्यू हा मानवांसाठी शेवट नाही आणि ख्रिस्तामध्ये मृत झालेले संत देवाशी संवाद साधत आहेत. रूपांतर आपल्याला 'थिओसिस' ची आठवण करून देते - देव आपल्याला येशू ख्रिस्ताच्या प्रतिमेत रूपांतरित करण्यासाठी आपल्यामध्ये कार्य करतो, आपण मानवांची परमेश्वरशी एकात्मता होण्याची संपूर्ण प्रक्रिया आहे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. पवित्र संस्कार विशेषत: पवित्र प्रभुभोजचे सेवन केल्याने आपल्या स्वभावात परिवर्तन होण्यास मदत होते.

२. प्रार्थना, उपवास आणि दान यांसारख्या चर्च पद्धती आपल्या चारित्र्याला आकार देण्यास आणि बदलण्यास मदत करतात.

३. आपण आपल्या जीवनातील अडचणींना या आशेने तोंड देऊ शकतो की एक दिवस आपण देवाला समोरासमोर पाहू शकतो.

| **१० ऑगस्ट २०२५** | | | **रुपांतर नंतरचा पहिला रविवार** |
|---|---|---|---|
| | **४१ वा रविवार** | | |
| | पवित्र शास्त्र वाचन | | |
| अनुवाद २५:१३-१६ | स्तोत्र २७ | याकोब ४:७ -५:६ | संत मत्तय २१:२८-३२ |

**शुभवर्तमान विषय :** परमेश्वराच्या इच्छेचे पालन करणारे व्हा

**हा शास्त्रभाग कशाबद्दल आहे?**

हा दृष्टांत एका माणसाबद्दल आहे ज्याला दोन मुलगे होते. तो दोघांना त्याच्या द्राक्षमळ्यात काम करण्यास सांगतो, परंतु त्यांनी एक प्रकारे प्रतिसाद दिला आणि दुसऱ्या प्रकारे वागले. यहुदी मुख्य याजक आणि वडिलांचा ढोंगीपणा दाखवण्यासाठी येशू हे उदाहरण वापरतो.

**यातून आपण काय शिकतो?**

फक्त काहीतरी बोलणे पुरेसे नाही; त्यापेक्षा योग्य वेळी योग्य गोष्ट करणे महत्त्वाचे आहे. आपण हे देखील शिकतो की परमेश्वर पापी माणसाच्या जवळ आहे ज्याला दयाळूपणाची गरज आहे, न कि आध्यात्मिकरित्या गर्विष्ठ लोक - जे सर्व योग्य गोष्टी सांगतात, परंतु त्यावर कृती करण्यात अपयशी ठरतात.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आपण स्व-धार्मिक आणि गर्विष्ठ होऊ नये तर त्या पाप्यांसारखे होऊ या हे ओळखतात आपल्याला पश्चात्तापाची आणि दयेची गरज आहे [संत लुक १८:१३].

२. अंतःकरणाने आणि वृत्तीने [१ पेत्र ५:५ (ब)] नम्र राहण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करा.

३. आपण परमेश्वराच्या इच्छेनुसार वागू या, फक्त तेच स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करतील [संत मत्तय ७:२१].

| १५ ऑगस्ट २०२५, शुक्रवार<br>**थियोटोकोसच्या डोर्मिशनचा सण**<br>**(शूनयो)** | | | |
|---|---|---|---|
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| निर्गम ३:१-६; १९:१६–२३ | यहेज्केल ४४:१-३ | इब्री २:१४-१८; ९:३-१२ | संत लुक ११:२२-२८ |

**शुभवर्तमान विषय :** मृत्यू हा स्वर्गाचा दरवाजा आहे

**हा उत्सव कशाबद्दल आहे?**

हा सण माता मरीया, परमेश्वराची माता हिचा 'स्वर्गवास' म्हणून साजरा केला जातो.

**यातून आपण काय शिकतो?**

हे चर्च माता मरीया परमेश्वराच्या मातेवर किती प्रेम आणि आदर करते याची आठवण करून देते. आपण शिकतो की मृत्यूला घाबरण्याची गरज नाही; जे ख्रिस्तामध्ये मरतात त्यांच्यासाठी मृत्यू ही आनंदाची घटना आहे. दिवंगतांना आपण कधीही विसरता कामा नये; पण त्यांच्या स्मृती जिवंत ठेवा.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आम्ही माता मरीयेचा आदर आणि प्रेम करतो - सर्वात महान संत, तिच्या प्रतिकाला आदर करून, *जसे* चर्चने नेहमीच केले आहे.

२. आपल्या दैवी आराधनाविधीमध्ये आणि विशेष दिवशी आपल्यापासून स्वर्गवासी झालेल्या संतांचे स्मरण करून आपण त्यांची आठवण जिवंत ठेवतो.

३. जे आपल्यापासून निघून गेले आहेत, जसे की माता मरीया आणि आमचे प्रिय दिवंगत मेट्रोपॉलिटन, अथेनेसियस योहान आता येशूसोबत आहेत आणि ते आमच्यासाठी मध्यस्थी करत आहेत.

* जेव्हा आपण संत मरीयेला थियोटोकोस - ज्याचा अर्थ दैववाहक' म्हणून आदर करतो, तेव्हा आम्ही पुष्टी करतो की येशूचे देवत्व आणि मानवता वेगळे नाहीत. त्याऐवजी एक व्यक्ती आहे, ज्याचे दोन स्वभाव आहेत: दैवी आणि मानव. येशू हा देव-पुरुष होता.

| १७ ऑगस्ट २०२५ | | डॉर्मिशन नंतरचा पहिला रविवार | |
|---|---|---|---|
| ४२ वा रविवार | | | |
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| १ शमुवेल ८:४-९ | स्तोत्र ३४:१५-२२ | इफिस ६:१०-१७ | संत लुक ६:३९-४५ |

**शुभवर्तमान विषय :** इतरांचा न्याय करू नका, परंतु दयाळू व्हा

**हा शास्त्रभाग कशाबद्दल आहे?**

आपण इतरांचा न्याय का करू नये, तर स्वतःला तपासा; याबद्दल येशू एक दाखला सांगतो.

**यातून आपण काय शिकतो?**

आपण हे शिकतो कि आपण इतरांचा न्याय करू नये, कारण त्याच मापाने आपला न्याय केला जाईल, ज्याप्रमाणे इतरांचा न्याय करतो [संत मत्तय ७:१]. आपण हे देखील शिकतो की आपण क्षमा केली पाहिजे आणि दयाळू असले पाहिजे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. जेव्हा आपल्याला दुसऱ्याचा न्याय करण्याचा मोह होतो तेव्हा आपण थांबले पाहिजे आणि पश्चात्ताप केला पाहिजे; कारण ज्या गोष्टी आपण इतरांना दाखवतो त्याबद्दल आपण दोषी असतो.

२. आपण इतरांना क्षमा करण्यात उदार असले पाहिजे कारण परमेश्वराने आपल्याला क्षमा केली आहे.

३. नेहमी 'येशूची प्रार्थना' करा: “प्रभु येशू ख्रिस्ता, परमेश्वराचा पुत्र, मज पाप्यावर दया कर.”

| २४ ऑगस्ट २०२५ <br> ४३ वा रविवार | | | डॉर्मिशन नंतरचा दुसरा रविवार |
|---|---|---|---|
| पवित्र शास्त्र वाचन | | | |
| उत्पत्ति ६:३-१२ | स्तोत्र १२:१-७ | १ थेस्सलनी ५:१-११ | संत लुक ११:९-२० |

**शुभवर्तमान विषय : सतत प्रार्थना करणे**

**हा शास्त्रभाग कशाबद्दल आहे?**

प्रार्थनेबद्दल शिकवताना, येशू म्हणतो की परमेश्वर आमच्या त्या निरंतर प्रार्थनांचे उत्तर देतो जे आमच्या दृष्टीने चांगले आहेत. जेव्हा येशू भूतबाधा झालेल्या माणसाला बरे करतो तेव्हा बरेच लोक आश्चर्यचकित होतात, तर काहीजण येशूची परीक्षा घेतात आणि त्याच्यावर चमत्कार करण्यासाठी शैतानी शक्ती वापरल्याचा आरोप करतात.

**यातून आपण काय शिकतो?**

देवाला आवडणाऱ्या गोष्टींसाठी आपण प्रार्थना करणे सोडू नये. जे परमेश्वराची परीक्षा घेतात त्यांना त्यांनी मागितलेले उत्तर कधीच दिले जात नाही [वचन १६] आणि येशू भुते काढतो कारण तो देवाचा पुत्र आहे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आपण कधीही निराश होऊ नये आणि चांगल्या गोष्टींसाठी प्रार्थना करणे सोडू नये. चिकाटी ठेवावी.

२. त्याची परीक्षा घेण्यासाठी देवाकडून चिन्हे मागणे टाळा; त्याऐवजी त्याच्या वचनांवर विश्वास ठेवा.

३. जेव्हा येशूच्या नावाने लोकांच्या बाबतीत चांगल्या गोष्टी घडतात तेव्हाही विरोध होईल.

| ३१ ऑगस्ट २०२५ डॉर्मिशन नंतर तिसरा रविवार<br>४४ वा रविवार | | | |
|---|---|---|---|
| शास्त्र वाचन भाग | | | |
| यहेज्केल १८:२१-२४ | स्तोत्र १४६ | २ करिंथ १०:१-७ | संत मत्तय: १७:२२-२७ |

**शुभवर्तमान विषय :** आपली कर्तव्ये पूर्ण करणे.

**हा भाग कशाविषयी आहे?**

येशू त्याचा दुखभोग आणि त्याच्या मृत्यूची भविष्यवाणी करतो. तसेच तो एक चमत्कार करतो जेणेकरूनतो आणि संत पेत्र दोघेही अनिवार्य मंदिराचा कर भरू शकतील.

**यातून आपण काय शिकतो?**

आपण शिकतो की, येशू स्वेच्छेने वधस्तंभावर गेला. त्याच्यावर कोणीही जबरदस्ती केली नाही; त्यासाठी तो तयार झाला होता. नागरी कर्तव्ये आणि कायद्यांशी एकनिष्ठ राहून येशूला अनावश्यक गुन्हा टाळायचा होता आणि म्हणून त्याने अनिवार्य कर भरला.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. येशूला प्रत्येक गोष्टीची, आपल्या गरजा आणि आपल्या भविष्याची जाणीव आहे. हे जाणून घेणे आपल्यासाठी खूप दिलासादायक आहे.

२. येशूने आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आपल्याला मदत करण्याचे वचन दिले आहे. आपण फक्त त्याच्यावर विश्वास ठेवला पाहिजे आणि प्रत्येक गोष्टीला ख्रिस्ताच्या अधीन केले पाहिजे.

३. आपण विनाकारण लोकांना नाराज करू नये ,जरी आपल्याला तसे करण्याचा अधिकार असला.

| ७ सप्टेंबर २०२५ डॉर्मिशन नंतर चौथा रविवार<br>४५ वा रविवार | | | |
|---|---|---|---|
| **शास्त्र वाचन भाग** | | | |
| निर्गम ३:१-६, ११-१४ | स्तोत्र ३७:१-११ | १ करींथ ३:१६-२३ | संत मत्तय ५:३८-४८ |

**शुभवर्तमान विषय :** प्रामाणिकपणे चाला.

**हा भाग कशाविषयी आहे?**

आपण कोणत्या तत्त्वांनुसार जगले पाहिजे याविषयी शिकवताना, येशू इतरांवर प्रेम करण्याच्या महत्त्वावर जोर देतो, जरी ते आपल्याबरोबर निर्दयी असुन किवा प्रेमळ नसतील.

**यातून आपण काय शिकतो?**

आपण शिकतो की आपण वाईटाला वाईटाने प्रतिसाद देऊ नये, तर त्याऐवजी प्रेम आणि दयेने. असे केल्याने, आपण वडिलांचे अनुकरण करतो आणि परिपूर्णतेत वाढतो.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आत्म-नियंत्रणासाठी प्रार्थना करा, जेणेकरून जेव्हा कोणी तुम्हाला शब्द किंवा कृतीने दुखावते तेव्हा तुम्ही कठोर शब्दांनी किंवा हिंसाचाराने प्रत्युत्तर देणार नाही.

२. जे तुम्हाला विरोध करतात त्यांना परमेश्वर आशीर्वाद देईल अशी प्रार्थना करा.

३. दयादान , प्रार्थना आणि उपवास [संत मत्तय ६:१-१८] यांसारख्या अध्यात्मिक शिस्तींचा सराव केल्याने आपल्याला आपल्या स्वर्गातील पित्यासारखे बनण्यास मदत होईल.

| ८ सप्टेंबर २०२५, मंगळवार<br>**थियोटोकोसच्या जन्माचा सण** | | | |
|---|---|---|---|
| शास्त्र वाचन भाग | | | |
| उत्पत्ति २८:१०-१७ | यहेज्केल ४३:२७–४४:४ | फिलिप्पै २:५-११ | संत लूक १:३९–४९,५६;११:२७ २८ |

**शुभवर्तमान विषय :** माता मरियेचे महान उदाहरण

**ही सण कशाबद्दल आहे?**

हा सण आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची माता, संत मरियेच्या जन्माला साजरे करण्याचा आहे, जसे कि पवित्र चर्चच्या परंपरेनुसार आपल्यापर्यंत पोहचला आहे.

**यातून आपण काय शिकतो?**

परमेश्वराने एका श्रद्धावान आणि वृद्ध जोडप्याच्या प्रार्थनेला कसे उत्तर दिले आणि त्या जोडप्याने त्यांचे वचन दिलेले मूल, मरिया, प्रभुला भेट म्हणून कसे अर्पण केले हे आपण शिकतो.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. माता मरियेच्या पालकांप्रमाणेच, हे आपले सर्वात मोठे सौभाग्य आहे कि आपण आपल्या मुलांना. मुलगा असो वा मुलगी असो, त्यांना परमेश्वराची आणि पवित्र चर्चची सेवा करण्यासाठी अर्पण करा.

२. माता मरियेच्या जीवनात परमेश्वराच्या उद्देशांचे पालन करण्याचे आमच्याकडे एक उत्तम उदाहरण आहे, जी आपल्यासारखीच एक मानव होती आणि तिने पूर्णपणे परमेश्वराची आज्ञा पाळण्याचे निवडले.

३. आपण जिवंत परमेश्वराचे‘मंदिरे’ बनले पाहिजे – जसे माता मरिया प्रमाणेच आणि प्रत्येकाला ख्रिस्ताकडे निर्देशित केले पाहिजे.

| १४ सप्टेंबर २०२५ ४६ वा रविवार | | पवित्र वधस्तभाचा सण | |
|---|---|---|---|
| **शास्त्र वाचन भाग** | | | |
| गणना २१:४-९ | स्तोत्र ९८:१-५ | गलती २:१७–३:१४ | संत लूक २१:५-२८ |

**शुभवर्तमान विषय : वधस्तभाचा विजय**

**ही सण कशाबद्दल आहे?**

हा सण ‘खरा वधस्तभाच्या’ शोधाच्या ऐतिहासिक घटनेचे स्मरण करते – जो वधस्तंभ प्रभु येशू ख्रिस्ताला वधस्तंभावर खिळण्यासाठी वधस्तभाचा वापर केला होता.

**यातून आपण काय शिकतो?**

आपण शिकतो की चौथ्या शतकात, संत हेलेनाला खरा वधस्तभ मिळाला, ह्या खरा वधस्तभाची चमत्कारिक पुष्टी झाली, आणि कसे तिच्या मुलाने सम्राट कॉन्स्टंटाईनने तनंत तेथे एक मंदिर बांधले.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. वधस्तंभ हे आपल्या विश्वासाचे प्राथमिक प्रतीक असल्याने, आम्ही स्वतःवर वधस्तभाचे चिन्ह बनवतो, आमच्या वेदीवर (घर आणि चर्च) वधस्तभ ठेवतो आणि त्याला परिधान देखील करतो.

२. वधस्तभ हे सर्व वाईटांवर परमेश्वराच्या विजयाचे चिन्ह आहे, आम्ही सणाच्या वेळी वधस्तभला जगाच्या चारही कोपऱ्यांमध्ये उचावतो.

३. जेव्हा आपण वधस्तंभाकडे पाहतो, तेव्हा आपण आपल्यासाठी ख्रिस्ताच्या दुःखाबद्दल परमेश्वराचे आभार मानतो.

४. वधस्तंभ हा ख्रिस्ताच्या आवाहनाची आठवण करून देतो कि आपण आपला वधस्तंभ उचलावा आणि त्याचे अनुसरण करावे.

| | |
|---|---|
| **२१ सप्टेंबर २०२५** | **पवित्र वधस्तभाचा उत्सवानंतरचा पहिला रविवार**<br>**४७ वा रविवार** |

| **शास्त्र वाचन भाग** | | | |
|---|---|---|---|
| यशया १:१०-२० | स्तोत्र ३४ | १ करिंथ २:१०-१६ | संत मार्क १३:२८-३७ |

**शुभवर्तमान विषय :** जागरूक रहे आणि तयार रहा

**हा भाग कशाविषयी आहे?**

ख्रिस्त नक्कीच परत येईल. पण त्याच्या 'अचानक' येण्याचा अर्थ असा आहे की आपण 'जागृत' आणि तयार राहणे आवश्यक आहे.

**यातून आपण काय शिकतो?**

काहीवेळा, त्याच्या येण्यास विंलब झाल्यामुळे, आपण पृथ्वीवरील कार्याकडे विचलित होऊ शकतो [संत मत्तय १३: ३८,३९] आणि अप्रस्तुत [दहा कुमारींची बोधकथा] पकडले जाऊ शकते. आपण आपल्या जीवनात आळशीपणा आणि आत्मसंतुष्टता येऊ देऊ नये, तर तो परत येईपर्यंत त्याच्या कार्यात विश्वासू आणि तत्पर राहावे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. कधीही अश्या लोकांकडून धोका खाऊ नका जे म्हणतात– येशू एका विशिष्ट तारखेला परत येत आहे! त्याच्या परतीची वेळ कोणालाच माहीत नाही आणि ती जाणून घेणाच्या पाठीमागे धावू नये.

२. जसे त्याने आम्हाला वचन दिल्याप्रमाणे, ख्रिस्त आपल्याला घेऊन जाण्यासाठी परत येईल याची खात्री बाळगा.

३. जेव्हा तो येतो तेव्हा त्याने आपल्याला विश्वासू पाहावे; म्हणून, ख्रिस्ताने आपल्याला जे करायला दिले आहे ते आपण करत राहू या.

| २८ सप्टेंबर २०२५ पवित्र वधस्तभाचा उत्सवनंतरचा दुसरा रविवार<br>४८वा रविवार | | | |
|---|---|---|---|
| **शास्त्र वाचन भाग** | | | |
| १ राजे ३:५-९ | स्तोत्र १९:७-१४ | १ करिंथ २:१४–३:९ | संत मत्तय १६:५-१२ |

**शुभवर्तमान विषय** : खोट्या शिकवणी आणि शिक्षकांपासून सावध रहा

**हा भाग कशाविषयी आहे?**

येथे येशू त्याच्या शिष्यांना ढोंगी परूशी आणि सदूकींच्या शिकवणींचा चुकीचा प्रभाव पडण्यापासून सावध राहण्याचा इशारा देतो.

**यातून आपण काय शिकतो?**

जरी शिष्य येशूबरोबर होते, तरीही विश्वासाच्या कमतरतेमुळे, त्यांची अंतःकरणे कठोर झाली होती, ज्यामुळे त्यांना आध्यात्मिक सत्य समजू शकले नाही. आपण हे देखील शिकतो की, जसे थोडेसे खमीर पुष्कळ पिठात पसरते आणि पूर्णपणे खमीर बनवते, त्याचप्रमाणे खोट्या शिकवणी वेगाने पसरू शकतात आणि लोकांचे जीवन नष्ट करू शकतात.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. देवाला त्याचे सत्य समजून घेण्यासाठी आपल्याला विवेक आणि ज्ञानी अंतःकरण देण्याची विनंती करा.

२. पवित्र चर्चच्या योग्य शिकवणींना धरून राहा, जे प्रारंभिक चर्च पित्यांनी आपल्याला दिली आहे, जेणेकरून आपण भरकटणार नाही.

३. खोट्या शिक्षकांची आणि त्यांच्या शिकवणींचे मनोरंजन करू नका; ते तुमचा नाश करतील [२ तीम. २:१७].

| ५ ऑक्टोबर २०२५ | | पवित्र वधस्तभाचा सणानंतरचा तिसरा रविवार<br>SOC रविवार – विशेष दान | |
|---|---|---|---|
| ४९वा रविवार | | | |
| शास्त्र वाचन भाग | | | |
| नीतिसूत्रे १:२-९ | स्तोत्र ८ | रोम ८:१-११ | संत मार्क २:२३-२८ |

**शुभवर्तमान विषय :** दयेचा कायदेशीरपणावर विजय झाला पाहिजे

**हा भाग कशाविषयी आहे?**

[संत मत्तय १२:१-१४ आणि संत लूक ६:१-११ देखील वाचा]

परुशी, जे त्यांच्या धार्मिक नियमांमध्ये कठोर आहेत, त्यांना येशूमध्ये दोष आढळतो, कारण त्याच्या शिष्यांनी शब्बाथ दिवशी 'नियम' मोडला होता. स्वतः कायदा देणाऱ्या येशूने, , त्यांना आठवण करून देली परमेश्वर बलिदान (धार्मिक रीतीरिवाज पाळणे) नाही पण दया इच्छितो [संत मत्तय १२:७].

**यातून आपण काय शिकतो?**

परमेश्वराचे नियम लोकांची निंदा करण्यासाठी वापरू नयेत; त्यांनी आम्हाला इतरांच्या गरजांबद्दल असंवेदनशील बनवू नये.' दया' असणे - चांगले करणे आणि इतरांबद्दल आणि त्यांच्या गरजांबद्दल संवेदनशील असणे, केवळ धार्मिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यापेक्षा प्राधान्य दिले पाहिजे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. लोकांवर दया करा; त्यांच्या गरजांप्रती संवेदनशील व्हा आणि त्यांचा न्याय करण्यास धीमे व्हा.

२. धार्मिक नियमांमुळे आम्ही आंधळे किंवा इतरांबद्दल असंवेदनशील बनू देऊ नये.

३. येशूच्या उदाहरणाचे अनुसरण करा आणि स्व-धार्मिक परुशांचे नाही.

| १२ ऑक्टोबर २०२५ पवित्र वधस्तभाचा उत्सवनंतरचा चौथा रविवार<br>५०वा रविवार | | | |
|---|---|---|---|
| **शास्त्र वाचन भाग** | | | |
| १ राजे ८:२२-३० | स्तोत्र ४२ | १ करिंथ १:२१-२९ | संत लूक १६:९-१८ |

**शुभवर्तमान विषय** : पैशाविषयी विश्वासू रहा,

**हा भाग कशाविषयी आहे?**

हा उतारा विश्वासू असण्याबद्दल बोलतो, विशेषत: आपल्या पैशांशी (भौतिक मालमत्ता, संपत्ती इ.), पैशाबद्दल आपला दृष्टीकोन कसा असावा आणि आपल्या जीवनातील खऱ्या आध्यात्मिक आशीर्वादांशी त्याचा कसा संबंध आहे.

**यातून आपण काय शिकतो?**

आपण हे शिकतो की पैसा स्वतःच वाईट नसला तरी, पैसा हाताळण्यात आपली विश्वासूता (आपला किंवा इतरांचा) परमेश्वराने आपल्याला आध्यात्मिक आशीर्वाद देणाऱ्याशी थेट संबंधित आहे.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. दशमांश, अर्पण, दान आणि परमेश्वराच्या कार्यासाठी परमेश्वराने आपल्याला दिलेले पैसे आणि संसाधने यांच्याशी विश्वासू रहा.

२. केवळ पैशावर आधारित निर्णय घेऊन कधीही पैशाचे गुलाम होऊ नका.

३. अनंतकाळचे मित्र मिळविण्यासाठी पैशाचा वापर करा.

| १९ ऑक्टोबर २०२५ पवित्र वधस्तभाचा उत्सवनंतरचा पाचवा रविवार ५१ रविवार | | | |
|---|---|---|---|
| **शास्त्र वाचन भाग** | | | |
| **लेवीय २:१-३** | **स्तोत्र ४६** | **१ तीमथ्य ६:१३-२१** | **संत मत्तय २३:१-१२** |

**शुभवर्तमान विषय :** नम्र लोक उच्च केले जाईल

**हा भाग कशाविषयी आहे?**
काहीजण त्यांच्या आध्यात्मिक अधिकाराचा कसा दुरुपयोग करतात आणि आपण त्याचे शिष्य त्यांच्यापेक्षा कसे वेगळे असावे याबद्दल येशू बोलतो..

**यातून आपण काय शिकतो?**
आपण हे शिकतो की आपण परमेश्वराच्या नजरेतून सुटू शकत नाही आणि आपले सर्व हेतू देवाला स्पष्टपणे दिसत आहेत. म्हणून, जेव्हा आपण स्वतःला मोठे करतो तेव्हा ते त्याला संतुष्ट करत नाही. नम्रता आणि सेवक अंतःकरणामुळे देवाला आनंद होतो.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आपण कधीही इतरांना पाहण्यासाठी गोष्टी करू नयेत.

२. आपल्यावर परमेश्वराने नेमलेला अधिकाऱ्याच्या आधिनते मध्ये आपण राहिले पाहिजे आणि त्यांच्या आज्ञा पाळल्या पाहिजे.

३. नम्र आणि भग्न-हृदयी असण्याचा प्रयत्न करा.

- ***ढोंगी नेत्यांना वडील आणि शिक्षक न म्हणण्याच्या येशूच्या चेतावणीचा गैरसमज करू नका. कारण या शब्दाच्या उपयोगाच्या विरुद्ध प्रतिबंध लावणे असे नाही. चर्चच्या प्रारंभिक दिवसांपासून, ज्यांना परमेश्वराने अधिकार दिलेला आहे - बिशप आणि याजकांना 'वडील' म्हटले गेले.***

| | |
|---|---|
| २६ ऑक्टोबर, २०२५ | पवित्र वधस्तभाचा उत्सवनंतरचा सहावा रविवार<br>५२वा रविवार |

**शास्त्र वाचन भाग**

| **यशया ४३:१६-२५** | **स्तोत्र ८४** | **१ करिंथ ५:६-१३** | **संत लूक १८:१८-२७** |
|---|---|---|---|

**शुभवर्तमान विषय :** सर्वांपेक्षा देवाला प्राधान्य देणे

**हा भाग कशाविषयी आहे**

एक श्रीमंत, तरुण, नीतिमान शासक यांच्यातील संभाषणात, ज्याला प्रामाणिकपणे परमेश्वराचे अनुसरण करायचे आहे, येशू त्याला हे समजण्यास मदत केली कि परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करण्याच्या मार्गात काय बाधा आहे.

**यातून आपण काय शिकतो?**

जगातील सर्व संपत्तीपेक्षा परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करणे महत्त्वाचे आहे. पण आपण संपत्तीशी इतके संलग्न असू शकतो की ते आपल्याला परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करण्यापासून रोखू शकते.

**आपण हे कसे लागू करू शकतो?**

१. आज्ञा पाळणे पुरेसे नाही; परंतु ख्रिस्ताच्या फायद्यासाठी सर्व त्याग करण्यास तयार असले पाहिजे.

२. सर्व काही - संपत्ती, हुद्दा, कुटुंब, मानसन्मान, समाज, शिक्षण आणि या सर्व गोष्टी परमेश्वर नंतर आल्या पाहिजेत.

३. जर आपल्याला ख्रिस्ताचे पूर्णपणे अनुसरण करण्यापासून काही अडथळा येत असेल तर, प्रार्थना करा की परमेश्वर आपल्याला त्या आसक्तीवर मात करण्यास मदत करेल. देवाला काहीही अशक्य नाही.

## बिलीवर्स ईस्टर्न चर्च कॅलेण्डर २०२४-२०२५

| तारीख /दिवस | सण | वर्णन |
|---|---|---|
| ३ नोव्हेंबर २०२४, रविवार | चर्चचे पवित्रीकरण (कुधोश इथो) | लीटर्जिकल कॅलेंडर वर्षाची सुरुवात. चर्चचे पवित्रीकरण. |
| १० नोव्हेंबर २०२४, रविवार | चर्चचे समर्पण (हूदोश इथो) | चर्च समर्पण / चर्चचे नूतनीकरण. |
| १७ नोव्हेंबर २०२४, रविवार | जकारियाला घोषणा (सुबोरेह डाझखारयो) | ह्या दिवशी मुख्य देवदूत गॅब्रिएलद्वारे जखऱ्याला बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा जन्माचा संदेश देणारा दिवस म्हणून साजरा केला जातो.. |
| २१, नोव्हेंबर २०२४, गुरुवार | थियोटोकोसच्या प्रवेशाचा सण | जेव्हा एका छोट्या मुलीच्या रुपात कुमारी मरिया यरुशलेममधील मंदिरात प्रवेश करते ह्या संबंधाने हा सण साजरा केला जातो. |
| २४ नोव्हेंबर २०२४, रविवार | घोषणा थियोटोकोस ला (सुबोरेब दाबथलतो) | मुख्य देवदूत गॅब्रिएलने कुमारी मरियेला हि घोषणा केली की ती येशू ख्रिस्ताची माता होईल. |
| १ डिसेंबर २०२४, रविवार | नेटीविटीचा उपवास (२५ दिवसांचा उपवास) | येशू ख्रिस्ताच्या जन्माच्या तयारीसाठी उपवासाचा कालावधी. |
| १ डिसेंबर २०२४, रविवार | संत.मारियाची एलिझाबेथला भेट (मेझाल्टो) | संत मरियेची एलिझाबेथला भेट दिल्याच्या स्मरणार्थ दिवस. |
| ८ डिसेंबर २०२४, रविवार | योहान बाप्तिस्मा करणाऱ्याचा जन्म (मावळोदेब-डी-युबानॉन मॅमडोनो) | बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा जन्म साजरा करणारा दिवस. |

| तारीख /दिवस | सण | वर्णन |
|---|---|---|
| १५ डिसेंबर २०२४, रविवार | संत योसेफला घोषणा | येशूच्या जन्माबद्दल मुख्य देवदूत गॅब्रिएलची योसफाला घोषणा |
| १८ डिसेंबर २०२४, बुधवार | संत. थोमा प्रेषिताचा दुखरोनो | संत थॉमस हौतात्म्याचे स्मरण दिन |
| 25 डिसेंबर २०२४, बुधवार | **ख्रिस्ताच्या जन्माचा उत्सव (येल्डो)** | आपल्या प्रभूचे जन्म / प्रभूचा देह धारण |
| 1 जानेवारी २०२५, बुधवार | आमच्या प्रभूच्या सुंता सण | आपल्या प्रभूची सुंता साजरी करण्यासाठी आणि यहुदी परंपरेनुसार त्याला येशू हे नाव मिळाले. |
| ६ जानेवारी २०२५, सोमवार | **आमच्या थिओफनीचा प्रभूच्या सण (डेन्हो)** | यार्देन नदीत संत योहानाद्वारे यीशूच्या बाप्तिस्म्याच्या स्मरणार्थ हा सण साजरा केला जातो. |
| ७ जानेवारी २०२५, मंगळवार | संत.योहान बाप्तिस्मा देणाऱ्याचा दिवस | बाप्तिस्मा करणारा योहानाच शिरच्छेदनाच्या स्मरणार्थ सण साजरा करणे |
| ८ जानेवारी २०२५, बुधवार | संत.स्टीफनचे दिवस | हा सण संत स्तेफन जो डीकानांचा प्रमुख आणि प्रथम हुतात्म्याचे स्मरण करणारा असा साजरा केला जातो |
| १८ जानेवारी २०२५, शनिवार | संत.अथनाशियस महान, अलेक्झांड्रियाचा कुलगुरू | हा संत अथेनासियस महान उत्सव दिवस आहे, चौथ्या शतकातील अलेक्झांड्रियाचे कुलपिता, ज्यांना चर्चचे डॉक्टर मानले जाते आणि 'ऑर्थोडॉक्सीचे जनक' म्हणून संबोधले जाते. |

| तारीख /दिवस | सण | वर्णन |
|---|---|---|
| २ फेब्रुवारी २०२५, रविवार | ख्रिस्ताच्या सादरीकरणाचा सण (मायाल्थो) | ज्या दिवशी अर्भक येशूला मंदिरात सादर करण्यात आले तो दिवस साजरा करणे. |
| १० फेब्रुवारी २०२५, सोमवार | निनवेचा लेंट / तीन दिवसीय लेंट सुरू होतो | हा उपवास जुन्या काळातील निनवेच्या लोकांच्या उदाहरणानुसार केला जातो ज्यांनी प्रेषित योनाद्वारे देवाचा इशारा ऐकला आणि परमेश्वराची दया शोधण्यासाठी उपवासाची घोषणा केली. |
| १६ फेब्रुवारी २०२५, रविवार | सर्व स्वर्गवासी याजक (कोहने रविवार) | विश्वासू दिवंगत याजक तसेच पवित्र चर्चमधील त्यांचा खरा विश्वास आणि सेवा यांचे स्मरण करण्याचा दिवस. |
| २३ फेब्रुवारी २०२५, रविवार | सर्व स्वर्गवासी विश्वासी (अनेदे रविवार) | मंडळीतील सर्व मृत विश्वासूंच्या स्मरणार्थ दिवस. |
| २ मार्च २०२५, रविवार | महान लेंटचा पहिला रविवार (महान लेंटचा पेथुर्थ) (कोथिने रविवार) | काना येथे येशूने केलेल्या पहिल्या चमत्काराच्या स्मरणार्थ महान लेंटची सुरुवात होते. (पेथुर्थ- परत येणे, थांबणे.) |
| ३ मार्च २०२५, सोमवार | महान लेंटचा पहिला सोमवार | सलोख्याची सेवा महान लेंटच्या पहिल्या सोमवारी केली जाते जेणेकरून विश्वासूंना महान लेंटच्या हंगामात प्रवेश करण्यास तयार करण्यात मदत होईल. |
| ९ मार्च २०२५, रविवार | महान लेंटचा दुसरा रविवार | कुष्ठरोग्यांना बरे करण्याच्या चमत्काराचे स्मरण करण्याचा दिवस. |

## लेक्शनरी 2024–2025

| तारीख /दिवस | सण | वर्णन |
|---|---|---|
| १६ मार्च २०२५, रविवार | महान लेंटचा तिसरा रविवार (म्हारियो रविवार) | अर्धांगवायूच्या रोग्याला आरोग्य मिळण्याच्या स्मरणार्थाचा दिवस. |
| २३ मार्च २०२५, रविवार | महान लेंट चा चौथा रविवार (कनानैटो रविवार) | कनानी मुलीला बरे होण्याच्या स्मरणार्थाचा दिवस. |
| २५ मार्च २०२५, मंगळवार | **थियोटोकोसच्या घोषणेचा सण (सुबोरो)** | हा सण मुख्य देवदूत गब्रीएलाने कुमारी मरीयेला आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या देह धारणाची घोषणा केल्याचे स्मरण करुन देतो. |
| ३० मार्च २०२५, रविवार | महान लेंटचा पाचवा रविवार (कॅपिप्थो रविवार) | कुबड असलेल्या महिलाच्या उपचारांच्या स्मरणार्थाचा दिवस. |
| ६ एप्रिल २०२५, रविवार | महान लेंटचा सहावा रविवार (शॉम्यो रविवार) | अंध व्यक्तीच्या आरोग्य मिळण्याच्या स्मरणार्थाचा दिवस. |
| १३ एप्रिल, रविवार | **झावळ्याचा रविवार** | हा सण येरुशलेममध्ये आपल्या प्रभूच्या विजयी प्रवेशाचे स्मरण करुन देतो. |
| १६ एप्रिल २०२५, बुधवार | पवित्र बुधवार | हा महान आणि पवित्र सण आठवड्याचा बुधवारी आहे जेथे मंडळीला दोन घटना आठवतात- एका 'पापी स्त्री'कडून गंधरसाने ख्रिस्ताचा अभिषेक आणि यहुदाने त्याचा विश्वासघात करण्यासाठी यहुदी अधिकाऱ्यांशी केलेला करार. या दिवसाच्या संध्याकाळच्या सेवांमध्ये, पवित्र कार्याचा विधी सहसा विश्वासूंना दिला जातो. |

| तारीख /दिवस | सण | वर्णन |
|---|---|---|
| १७ एप्रिल २०२५, गुरुवार | पवित्र गुरुवार | हा पवित्र आठवड्याचा गुरुवार आहे, जेथे मंडळी ख्रिस्ताच्या गुढ प्रभुभोजनाचे स्मरण करते , ज्यामध्ये त्याने विधीची स्थापना केली व दैवी प्रभुभोज त्याच्या स्मरणात कायमचे पाळले जातात . |
| १८ एप्रिल २०२५, शुक्रवार | पवित्र शुक्रवार (हाशो) | येशू ख्रिस्त वधस्तंभावर खिळला गेला याचे स्मरण करण्याचा दिवस. |
| १९ एप्रिल २०२५, शनिवार | पवित्र शनिवार | हा पवित्र आठवड्याचा शेवटचा दिवस आहे आणि लेंट काळाचा शेवट ह्या दिवसापासुन होतो. मंडळी त्या दिवसाचे स्मरण करीते, जेव्हा ख्रिस्ताचे नश्वर शरीर थडग्यात पडले व अधोलोकात आपला आत्मा घेण्यासाठी आणि तेथील रहिवाशांना सुवार्ता सांगण्यासाठी उतरला होता. |
| २० एप्रिल २०२५, रविवार | **इस्टर उत्सवाचा (पुनरुत्थानाचा रविवार) (कॅम्थो)** | इस्टर (पुनरुत्थान): आपल्या प्रभु आणि तारणहार येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा दिवस किंवा सण. |
| २७ एप्रिल २०२५, रविवार | नवीन रविवार | पुनरुत्थाना (इस्टर ) नंतरचा पहिला रविवार, जेव्हा चर्च संत थोमा आणि इतर शिष्यांना पुनरूत्थान ख्रिस्ताला बघण्याची आठवन करुन देतो, जिथे प्रभु येशुने त्याच्या शिष्यांना जखमा दाखवल्या व संत थोमाच्या शंका दूर केल्या. |

# लेक्शनरी 2024–2025

| तारीख | सण | वर्णन |
|---|---|---|
| ८ मे २०२५, गुरुवार | अथेनासियस योहान १ मेट्रोपॉलिटनचा स्मृतिदिन | धन्य स्मृती व निद्रित मेट्रोपॉलिटन, अथेनासियस योहान १ यांचा स्मृतिदिन. |
| २९ मे २०२५, गुरुवार | **आपल्या प्रभुच्या स्वर्गारोहणाचा सण (सुलोको)** | हा सण येशूच्या पुनरुत्थानानंतर ४० दिवसांनी स्वर्गात गेल्याचे स्मरण करून देतो. |
| ८ जुन २०२५, रविवार | **पेन्टेकॉस्टचा सण ( पुनरूत्थाना नंतरचा पन्नासावा दिवस )** | पेन्टेकॉस्टच्या ( **पुनरूत्थाना नंतरचा पन्नासावा दिवस**) दिवशी प्रेषितांवर पवित्र आत्म्या उतला याच्या आठवना निमित्य हा सण साजरा केला जातो, ज्यामुळे चर्चची स्थापना झाली होती. |
| १६ जून २०२५, सोमवार | प्रेषितांचे लेंट सुरू होते | हा उपवास १६ जून रोजी सुरू होतो आणि २९ जून रोजी संपतो .या उपवासाची प्रथा प्रेषितांच्या पावलावर पाऊल ठेऊन केला जातो (ईब्री १३:७ व संत मत्तय ९:१५) मधील प्रभु येशूच्या वचनांची पूर्तता करण्यासाठी हा उपवास केला जातो. |

| तारीख/ दिवस | सण | वर्णन |
|---|---|---|
| २९ जून २०२५, रविवार | संत पेत्र आणि संतपॉलचा सण | या दोन महान संतांच्या स्मृतीसणाच्या उत्सवाने ह्या प्रेषितांच्या लेंटचे समापन होते. |
| ३ जुलै २०२५, गुरुवार | संत थोमा दिवस | ह्या सणामध्ये आपण संत थोमाच्या जीवन आणि कार्यांचे स्मरण करितो. |
| ५ जुलै २०२५, शनिवार | बहात्तर सुवार्तिकांचा सण | ह्या सणामध्ये ७२ शिष्यांची आठवन केली जाते. |
| १ ऑगस्ट २०२५, शुक्रवार | १५-दिवसीय डॉर्मिशन लेंट सुरू होते | १ ते १५ ऑगस्टपर्यंत, विश्वासूंनी त्यांच्या मृत्यूसाठी स्वत : ला तयार करण्याची ही वेळ आहे कारण परमेश्वराच्या मातेचा मृत्यू हा सर्वांसाठी एक इष्ट आणि अनुकरणीय मृत्यू आहे. |
| ६ ऑगस्ट २०२५, बुधवार | **आमच्या प्रभूच्या रूपांतरनाचा सण** | हा सण ताबोर पर्वतावर ख्रिस्ताच्या रूपांतराचे स्मरण करुन देतो. |
| १५ ऑगस्ट २०२५, शुक्रवार | **थियोटोकसच्या डोर्मिशनचा सण (शूनयो)** | हा सण आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या मातेच्या मृत्युशयन किंवा अनंतनिद्रे ची आठवण करतो. |
| ८ सप्टेंबर २०२५, सोमवार | **थियोटोकोसच्या जन्माचा सण** | हा सण आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या मातेच्या जन्माचे स्मरण करुन देतो. |
| १४ सप्टेंबर २०२५, रविवार | **पवित्र वधस्तभाचा सण** | हा सण सम्राट कॉन्स्टंटाइनची आई संत हेलन यांनी आपल्या प्रभु आणि तारणहार येशू ख्रिस्ताच्या खऱ्या वधस्तभाच्या शोध करुन दिल्याची आठवन करुन देतो. |
| २३ ऑक्टोबर २०२५, गुरुवार | संत याकोब प्रेषिताचा सण | आपल्या प्रभु येशूचा भाऊ आणि येरुसलेमचे पहिले बिशप संत याकोब यांच्या जीवनाचे स्मरण करुन देतो. |

## लेक्शनरी 2024–2025

| विशेष दिवस | आठवडा | तारीख |
|---|---|---|
| पितृ रविवार | ३ रा रविवार | १७ नोवेंबर २०२४ |
| महिला रविवार | ५ वा रविवार | १ डिसेंबर २०२४ |
| बाल रविवार | ६ वा रविवार | ८ डिसेंबर २०२४ |
| याजक रविवार | १३ वा रविवार | २६ जानेवारी २०२५ |
| युवा/तरुणांचा रविवार | २६ वा रविवार | २७ एप्रिल २०२५ |
| मिशन रविवार | ३२ वा रविवार | ८ जुन २०२५ |
| सेमिनरी रविवार | ३५ वा रविवार | २९ जुन २०२५ |
| सिस्टर्स ऑफ क्रॉस रविवार | ४९ वा रविवार | ५ ऑक्टोंबर २०२५ |